


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २६७ * नांदेड * बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# राहुल गांधी पोलिसांच्या ताब्यात, दिल्ली आंदोलनात मोठा गोंधळ; प्रियंका गांधींनाही घेतलं ताब्यात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन करणाऱ्या काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इतर नेत्यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. गेल्या आठ तासांपासून दिल्लीच्या आकाशवाणी भवनमध्ये ठिय्या मांडलेल्या राहुल गांधी यांना पोलिसांनी अखेर ताब्यात घेतलं आहे. राहुल यांच्यासोबत प्रियंका गाधी, केसी वेणुगोपाल यांच्यासह इतर प्रमुख नेत्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

मंगळवारी सकाळपासून इंडिया आघाडीच्या खासदारांनी दिल्लीमध्ये निवडणूक आयोगाच्या विरोधात भूमिका घेतली. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासह हे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जात असताना पोलिसांनी त्यांना अडवलं.



पोलिसांनी बॅरिकेड्स लावल्यानंतर राहुल गांधी यांनी त्यावर चढत तिरंगा फडकावला होता. त्यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं.

दरम्यान, दिल्ली पोलिसांच्या या व्हॅनला इंडिया आघाडीच्या खासदारांनी घेराव घातला आणि त्यातून राहुल गांधी आणि प्रियंका गांधी गनिमी काव्याने बाहेर पडले. त्यानंतर ते जवळच असलेल्या आकाशवाणी भवनमध्ये घुसले आणि त्या ठिकाणी ठिय्या मांडला. हे भवन निवडणूक आयोगाच्या कार्यालयापासून फक्त ३०० मीटर अंतरावर आहे.

> राहुल गांधी आणि काँग्रेसच्या खासदारांनी या ठिकाणी तब्बल आठ तासांहून अधिक काळ ठिय्या मांडल्यानंतर दिल्ली पोलिसांनी अखेर त्यांना ताब्यात घेतलं. काहीही होवो, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना भेटल्याशिवाय परत जाणार नाही, असं सांगणाऱ्या राहुल गांधी यांनी आकाशवाणी भवनमध्येच रात्र घालवण्याची तयारी केली होती. मात्र त्या आधीच दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं.

काहीही करून आम्ही निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाणार, मुख्य निवडणूक आयुक्तांनी आपल्याला भेट द्यावी यासाठी राहुल गांधी आग्रही होते. पोलिसांनी त्यांना अडवल्यानंतर त्यांनी त्याच ठिकाणी ठिय्या मांडला.

आम्हाला मुख्य निवडणूक आयुक्तांना भेटायचं आहे आणि काही प्रश्न विचारायचे आहेत या मतावर राहुल गांधी ठाम होते. तर तुम्हाला या ठिकाणी आंदोलन करता येणार नाही, या ठिकाणचं आंदोलन बंद करावं असं दिल्ली पोलिसांकडून सातत्याने सांगण्यात येत होतं.

दरम्यान, राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह काँग्रेसच्या नेत्यांना ताब्यात घेतल्यानंतर दिल्ली पोलिसांनी या ठिकाणचे बॅरिकेड्स काढून टाकले आणि रस्ता मोकळा केला.

# सिमेंट काँक्रिटच्या नवीन कामांवर बंदी; पाणी गळती दुरुस्तीसाठी ८ दिवसांची मुदत

## दुष्काळी परिस्थितीत पाणी बचतीसाठी मनपा आयुक्तांनी घेतली आढावा बैठक



**नांदेड (प्रतिनिधी)–** अल-निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे आगामी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत अत्यंत काटकसरीने, प्राधान्यक्रमाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करून पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे आदेश शासनाच्या जलसंपदा विभागाने ५ ऑक्टोबर रोजी दिले आहेत. या शासन निर्देशांची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दि. ६ ऑक्टोबर रोजी पाणी पुरवठा विभागाची एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली.

या बैठकित आयुक्तांनी दुष्काळ परिस्थितीचा सामना करण्यासाठी आणि शहरातील नागरिकांना पुढील उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये, यासाठी पाणी पुरवठा विभागाला अत्यंत काटेकोर नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. यासह सर्व अभियंत्यांनी वैयक्तिक जबाबदारी घेऊन ही कार्ये पार पाडावीत असे बजावले आहे. शहरातील उपलब्ध जलसाठा आणि दैनंदिन पाणी वापराचा पाणी पुरवठा विभागाकडून नियमित आढावा घेतला जाईल. यासोबतच पाणी टंचाईवर मात करण्यासाठी महापालिकेतर्फे व्यापक स्तरावर जनजागृती मोहीम राबवून नागरिकांना पाणी काटकसरीने वापरण्यासाठी आवाहन केले जाईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

बैठकीत प्रामुख्याने शासनाच्या निर्देशानुसार महानगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर (पान ५ वर...)

### नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरावे

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नांदेड शहरातील सर्व नागरिकांनी आपली सामाजिक व वैयक्तिक जबाबदारी ओळखणे अत्यंत गरजेचे आहे. पाण्याचा थोडाही अपव्यय होणार नाही, या दृष्टीकोनातून नागरिकांनी आपल्या घरातील नळांना तोट्या अथवा कॉक बसवून घ्यावेत. जेणेकरून पाणी वाहून जाणार नाही. पिण्याच्या पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने व योग्य पद्धतीने करावा, वाहने धुणे, रस्त्यावर किंवा अंगणात पाणी मारणे यासारख्या गोष्टींसाठी पिण्याच्या पाण्याचा अपव्यय पूर्णपणे टाळावा आणि पाणी बचतीला प्राधान्य द्यावे. त्याचप्रमाणे नागरिकांनी अनाधिकृत नळ जोडणी नियमित करून घ्यावी, यापुढे थकित पाणीपट्टी असणाऱ्या थकबाकीदारांची नळ जोडणी खंडित केली जाणार असून थकित पाणीपट्टी भरून नागरिकांनी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

## वेस्ट इंडिजविरूद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात भारताचा विजय

**लखनऊ (प्रतिनिधी)–** भारताच्या दौऱ्यावर असलेल्या वेस्ट इंडिज संघाविरूद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना भारताने ८ गडी राखून जिंकत विजयी सलामी दिली आहे. कर्णधार श्रेयस अय्यरने अवघ्या ४२ चेंडूतील टी-२० सामन्यांतील पहिले शतक झळकावले.

नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिज संघाला फलंदाजीस आमंत्रित करणाऱ्या भारतीय संघाकडून नमन धीर, अक्षर पटेल, कुलदीप यादव या गोलंदाजाच्या माऱ्यामुळे १७१ धावांत वेस्ट इंडिज संघाला रोखण्यात यश मिळविले.

# राज्यातील आणखी १९ तालुक्यांचा दुष्काळाच्या यादीत समावेश होणार

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर बनली असून राज्य सरकारने आतापर्यंत २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, २५ सप्टेंबरच्या शासन निर्णयात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान दाखवण्यात आले आहे, मात्र दुष्काळाच्या निकषात न बसणाऱ्या आणखी १९ तालुक्यांचा फेरविचार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या १९ तालुक्यांचा दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने पाठवण्यास सांगण्यात आले असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले, आपल्या राज्यात २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत की, पंचनामे करण्यात यावेत. शेतकरी नुकसान किती झालं आहे याचा आढावा घ्यावा. राज्यात १ कोटी ४९ लाख हेक्टर ६५ लाख २६ हेक्टर जमिनीचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. बाकी काम देखील सुरू आहे. १० तारखेपर्यंत सर्व पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. महसूल कृषी अधिकारी बांधावर जाऊन पंचनामे करत आहे. विभागनिहाय पाहिल्यास छत्रपती संभाजीनगर विभागात ६८ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. पुणे विभागात ३० टक्के, तर नाशिक विभागात २२ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. कोकण विभागात पंचनाम्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

दत्तात्रय भरणे पुढे म्हणाले की, दुष्काळ पाहणीसाठी केंद्र सरकारने पथक तयार केले आहे. मुक्तानंद अगरवाल प्रमुख असणार आहेत. पुढील ४ ते ५ दिवसांत महाराष्ट्रात येणार आहेत. जलसंधारण कृषी विभागाच्या माध्यमातून आपण काम करत आहोत. अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना सोबत आहे. १७ हजार कोटी रुपयांची मागणी आपण केली आहे. केंद्र सरकारने नक्कीच आपल्याला मदत केली आहे, असे त्यांनी म्हटले.

# राज्यभरात प्रत्येक जिल्ह्याला नवीन १ हजार ट्रान्सफार्मर मंजूर

## अखंडित वीजपुरवठ्यासाठी सरकारचे पाऊल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये बळीराजाला दिलासा देणारा अभूतपूर्व निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिति (डीपीडीसी) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने मंगळवारी मंजुरी दिली.

या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणाचे कामे युद्धपातळीवर सुरु होणार आहेत.

यंदाच्या कमी पर्जन्यमानामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. महावितरणकडून राज्यात सुमारे ४७ लाखांवर कृषी ग्राहकांना विविध क्षम तेच्या वितरण रोहित्रांद्वारे वीजपुरवठा केला जात आहे. दुष्काळी परिस्थितीत हा वीजपुरवठा सुरळीत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वीज यंत्रणा सक्षम करण्याचे आदेश दिले आहेत.

# विद्यार्थी सुरक्षेबाबत नांदेड पोलीस ॲक्शन मोडवर

## कोचिंग क्लासेस परिसरात फिक्स पॉईंट; महिला पोलिसांचा चोख बंदोबस्त

**नांदेड (शिवाजीराजे पाटील)–** ट्युशन एरिया परिसरात भरदिवसा एका माथेफिरूने एकतर्फी प्रेमातून केलेल्या प्राणघातक हल्ल्याच्या घटनेनंतर विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने नांदेड पोलीस दल ॲक्शन मोडवर आले आहे. नांदेड परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन आणि पोलीस उपअधीक्षक रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कोचिंग क्लासेस परिसरात विशेष खबरदारी घेतल्याचे दिसून आले.

नांदेड शहरातील राजेंद्रनगर ते भाग्यनगर परिसरातील विविध कोचिंग क्लासेसच्या बाहेर दिवसभर फिक्स पॉईंट करून पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



विशेष म्हणजे या बंदोबस्तात पुरेशा संख्येने महिला पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे दिसून आले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांच्या या उपाययोजनांमुळे कोचिंग क्लासेसचे संचालक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले. विशेषतः क्लासेस सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत विद्यार्थिनींना रोडरोमिओंकडून होणारा त्रास रोखण्यासाठी पोलिसांनी अधिक सतर्कता बाळगावी, अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत कोचिंग क्लासेस परिसरात नियमित गस्त, संशयितांवर लक्ष आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची उपस्थिती वाढविल्यास अशा घटनांना आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# डेंग्यू-मलेरियाचा संसर्ग वाढला; मनपाकडे डासांवर फवारणीसाठी यंत्रणाच अपुरी!

## ८१ नगरसेवकांच्या महापालिकेत एकाच फॉगिंग मशीनवर काम? आरोग्यसेवा वाऱ्यावर?

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात डेंग्यू, मलेरिया आणि अन्य संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असताना महानगरपालिकेच्या डास नियंत्रण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तब्बल ८१ नगरसेवक असलेली महानगरपालिका, विस्तीर्ण शहर क्षेत्र आणि लाखो नागरिकांची लोकसंख्या असताना डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक असलेली फॉगिंग यंत्रणा पुरेशी आहे का, हा प्रश्न आता नागरिक थेट प्रशासनाला विचारत आहेत. उपलब्ध माहितीनुसार शहरात फॉगिंगसाठी केवळ एका मशीनवर मोठ्या प्रमाणातील कामकाज अवलंबून असल्याची चर्चा आहे. या दाव्याची अधिकृत आकडेवारी महानगरपालिकेने जाहीर करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर स्वतंत्र आरोग्य विभाग आणि मलेरिया विभाग असल्याची नोंद आहे. मग शहरातील विविध भागांत डासांची वाढ होत असताना नियमित फॉगिंग किती भागात होते? कोणत्या प्रभागात किती वेळा धूरफवारणी करण्यात आली? किती फॉगिंग मशीन उपलब्ध आहेत? त्यापैकी किती कार्यरत आहेत? डास प्रतिबंधक औषधांचा किती साठा आहे? या प्रश्नांची उत्तरे सार्वजनिक करण्याची वेळ आली आहे.

नागरिकांच्या मते, अनेक भागांत साचलेले पाणी, कचरा, नाले आणि अस्वच्छ परिसर यामुळे डासांची उत्पत्ती वाढत आहे. अशा वेळी केवळ आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करणे, अळीनाशक औषधांची फवारणी, नियमित फॉगिंग आणि प्रतिबंधात्मक आरोग्य मोहीम अधिक महत्त्वाची ठरते.

मात्र नांदेडमध्ये नागरिकांच्या मनात वेगळाच प्रश्न निर्माण झाला आहे. महानगरपालिकेकडे टॅब देण्यासाठी पैसा आहे, पदाधिकाऱ्यांच्या वाहनांसाठी पैसा आहे, रंगरंगोटी आणि रोषणाईसाठी पैसा आहे; मग नागरिकांच्या जीवाशी संबंधित डास नियंत्रणासाठी पुरेशा फॉगिंग मशीन का नाहीत? हा प्रश्न कोणत्याही राजकीय पक्षाच्या बाजूने किंवा विरोधात नसून नागरिकांच्या मूलभूत आरोग्याच्या हक्काशी संबंधित आहे. महानगरपालिका ही नागरिकांच्या करातून आणि सार्वजनिक निधीतून चालणारी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. त्यामुळे आरोग्यासाठी पुरेसा निधी, मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

शहरात आजारांचा धोका वाढत असल्याच्या तक्रारी असतील, तर फॉगिंगचे नियोजन केवळ कागदावर न राहता प्रत्येक प्रभागात प्रत्यक्ष दिसले पाहिजे. फॉगिंग झाले असे सांगण्यापेक्षा कुठे, कधी, किती वेळा आणि कोणत्या औषधाने फॉगिंग झाले, याची माहिती नागरिकांसमोर ठेवली पाहिजे. महानगरपालिकेने तातडीने प्रभागनिहाय फॉगिंगचे वेळापत्रक, उपलब्ध फॉगिंग मशीनची संख्या, कार्यरत मशीन, औषधसाठा, खर्च आणि आतापर्यंत केलेल्या फवारणीची माहिती जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. कारण प्रश्न फक्त धूरफवारणीचा नाही, प्रश्न आहे नांदेडकरांच्या आरोग्याचा.




# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'जलतारा'अंतर्गत जलसंधारण कामांना गती द्या –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## लखमापूर येथे जलताराचे उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)–** माहूर तालुक्यात पावसाचा खंड लांबल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब अडवून तो जमिनीत मुरविण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात यावी. 'जलतारा'अंतर्गत अधिकाधिक कामे हाती घेऊन ती वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी आज माहूर तालुक्यातील लखमापूर ग्रामपंचायतीला भेट देऊन 'जलतारा'अंतर्गत जलसंधारण कामाचे उद्घाटन केले. यावेळी तहसीलदार अभिजीत जगताप, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामरोजगारसेवक, सरपंच तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

माहूर तालुक्यात पावसाचा खंड लांबल्याने शेतीसह पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे दुष्काळी (पान ५ वर...)

# दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत

## स्वारातीम विद्यापीठाचा हिवाळी-२०२६ परीक्षेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने दुष्काळग्रस्त तालुक्यांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हिवाळी-२०२६ परीक्षेच्या परीक्षा शुल्कातून सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १ ऑक्टोबर, २०२६ रोजी झालेल्या ऑनलाइन बैठकीत राज्यातील दुष्काळसदृशपरिस्थितीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा



विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, विद्यापीठाची संकुले व उपपरिसरे तसेच इतर संबंधित संस्थांमध्ये पदवी, पदविका, पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या पात्र नियमित विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, अशा सूचना देण्यात आल्या.

त्यानुसार हिवाळी-२०२६ अर्थात नोव्हेंबर-डिसेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर, व्यावसायिक व अव्यावसायिक नियमित अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नमुन्यात महाविद्यालयांनी सादर करणे आवश्यक आहे.

या सवलतीसाठी विद्यार्थ्यांनी दुष्काळग्रस्त तालुक्यातील रहिवासी असल्याचा पुरावा तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपर्यंत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे (पान ५ वर...)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# एआयचा फुगा फुटला तर?

जागतिक अर्थव्यवस्थेत संकट येण्यापूर्वी काही संकेत उमटतात. चलनांचे अवमूल्यन, सरकारी रोख्यांवरील वाढते परतावे, भांडवली बाजारातील अस्थिरता आणि एखाद्या नव्या क्षेत्रातील अवास्तव गुंतवणूक ही त्यापैकी काही प्रमुख चिन्हे. आज आशियाच्या आर्थिक चित्राकडे पाहिले तर १९९७ च्या आशियाई आर्थिक संकटाची आठवण होणे स्वाभाविक आहे. मात्र, यावेळी परिस्थिती तशीच असेल असे मानणे घाईचे ठरेल. तरीही अमेरिकेतील कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय' क्षेत्रातील प्रचंड गुंतवणूक भविष्यात जागतिक अर्थव्यवस्थेसाठी जोखमीचे केंद्र ठरू शकते, हा इशारा दुर्लक्षित करण्यासारखा नाही. १९९७ मध्ये आशियातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्था परकीय भांडवलावर मोठ्या प्रमाणात अवलंबून होत्या. चलनांचे अवमूल्यन, कर्जाचा वाढता बोजा आणि वित्तीय व्यवस्थेतील कमकुवतपणा यामुळे संकटाने विक्राळ रूप धारण केले. आज मात्र परिस्थिती वेगळी आहे. अनेक आशियाई देशांकडे मोठ्या प्रमाणावर परकीय चलनसाठे आहेत. बँकिंग व्यवस्था तुलनेने सक्षम आहे आणि आर्थिक धोरणांमध्ये पूर्वीपेक्षा अधिक सावधगिरी आहे. त्यामुळे '१९९७ पुन्हा येणार' असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. पण त्या संकटातून धडा घेऊन संभाव्य धोक्यांची पूर्वकल्पना घेणे आवश्यक आहे. यातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एआयवरील अमेरिकन कंपन्यांचा प्रचंड खर्च. मायक्रोसॉफ्ट, गुगल, मेटा यांसारख्या कंपन्या एआय डेटा सेंटर, चिप्स, सर्व्हर आणि संगणकीय पायाभूत सुविधांवर अब्जावधी डॉलर खर्च करीत आहेत. या गुंतवणुकी-मुळे तंत्रज्ञान क्षेत्राला अभूतपूर्व चालना मिळाली आहे. परंतु या खर्चाच्या तुलनेत एआयमधून निर्माण होणारा प्रत्यक्ष महसूल आणि नफा कितपत टिकाऊ आहे, हा प्रश्न आता विचारला जाणे अपरिहार्य आहे. एआयमध्ये गुंतवणूक वाढणे ही समस्या नाही; अपेक्षांच्या तुलनेत प्रत्यक्ष परतावा कमी पडणे ही खरी समस्या आहे. गुंतवणूकदारांनी भविष्यातील नफ्याची अवास्तव अपेक्षा धरली आणि त्यानुसार कंपन्यांचे मूल्यांकन वाढले, तर त्यातून फुगा निर्माण होऊ शकतो. एखाद्या क्षणी या अपेक्षा खोट्या ठरल्या, तर गुंतवणूक अचानक आटू शकते. त्याचा परिणाम केवळ अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्यांवर होणार नाही; त्याची साखळी संपूर्ण आशियापर्यंत पोहोचू शकते. तैवान आणि दक्षिण कोरिया यांचा धोका यामुळे अधिक आहे. जगातील अत्याधुनिक एआय चिप्सच्या पुरवठ्यात या दोन देशांचे महत्त्व प्रचंड आहे. अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्यांनी एआयवरील खर्च कमी केला तर चिप्सची मागणी कमी होऊ शकते. त्याचा परिणाम उत्पादन, निर्यात, रोजगार आणि गुंतवणुकीवर होईल. एका क्षेत्रातील मागणी कमी होऊन संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची ही साखळी आजच्या परस्परावलंबी जगात काही नवीन नाही. भारतानेही या धोक्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. भारत, तैवान किंवा दक्षिण कोरियाप्रमाणे एआय चिप्सचा प्रमुख निर्यातदार नसला, तरी भारतीय माहिती-तंत्रज्ञान उद्योगाचा अमेरिकन बाजाराशी अत्यंत जवळचा संबंध आहे. अमेरिकन कंपन्यांनी तंत्रज्ञानावरील खर्च कमी केला तर भारतीय आयटी कंपन्यांना नवीन प्रकल्प, करार आणि रोजगाराच्या संधींचा फटका बसू शकतो. त्याचबरोबर जागतिक जोखीम वाढल्यास परदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजारातून पैसा काढण्याची शक्यता असते. शेअर बाजारातील घसरण, रुपयावर दबाव आणि गुंतवणुकीतील मंदी असे परिणाम त्यातून संभवतात. भारतातील एआय आणि तंत्रज्ञान स्टार्टअप्ससाठीही ही धोक्याची घंटा आहे. आज केवळ 'एआय' हा शब्द गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पुरेसा ठरत आहे. पण तंत्रज्ञानातील नावीन्य आणि व्यावसायिक व्यवहार्यता यामध्ये फरक आहे. महसूल नसलेल्या किंवा नफा मिळविण्याचा स्पष्ट मार्ग नसलेल्या कंपन्यांचे मूल्यांकन केवळ भविष्यातील शक्यतांवर वाढत असेल, तर सावध होण्याची वेळ आली आहे. अमेरिकन सरकारी रोख्यांवरील वाढता परतावा आणि येनची घसरण यांसारखे संकेतही बाजारातील बदलत्या समीकरणांची जाणीव करून देतात. मात्र प्रत्येक आर्थिक संकेत संकटाची भविष्यवाणी करतोच असे नाही. अर्थव्यवस्था ही अनेक घटकांनी चालणारी गुंतागुंतीची व्यवस्था आहे. त्यामुळे भीती पसरविण्याऐवजी जोखीम ओळखून तयारी करणे महत्त्वाचे. भारतासाठी याचा स्पष्ट धडा आहे की, एआयची शर्यत जिंकायची, पण एआयच्या फुग्यावर स्वार होऊन अर्थव्यवस्था धोक्यात घालायची नाही. देशाने देशांतर्गत मागणी मजबूत करणे, निर्यात बाजारात विविधता आणणे, सेमीकंडक्टर आणि तंत्रज्ञान क्षेत्रात स्वावलंबन वाढविणे, बँकिंग व्यवस्था सक्षम ठेवणे आणि परकीय गुंतवणुकीवरील अतिनिर्भरता कमी करणे आवश्यक आहे. १९९७ चे संकट जसे अचानक आले तसेच पुढील संकटही एखाद्या अनपेक्षित मार्गाने येऊ शकते. यावेळी त्याचे नाव एआय असेलच असे नाही. म्हणूनच प्रश्न '१९९७ पुन्हा येणार का?' हा नसून 'पुढील संकट आले तर आपण त्यासाठी किती तयार आहोत?' हा असायला हवा. आर्थिक व्यवस्थेने संकेत वाचले आणि वेळीच सावधगिरी बाळगली, तर संकट टाळता येते; पण संकेतांकडे दुर्लक्ष केले तर इतिहासाची पुनरावृत्ती होण्यासाठी १९९७ हे वर्ष पुन्हा यायलाच हवे असे नाही.

# आधुनिक मराठी कवितेचे जनक 'कवी केशवसुत'!



मराठी साहित्याच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, त्यांनी केवळ साहित्यनिर्मिती केली नाही, तर आपल्या लेखणीच्या सामर्थ्याने एका नव्या युगाची सुरुवात केली. आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून ज्यांचे नाव आदराने घेतले जाते, ते म्हणजे कवी केशवसुत. त्यांचे मूळ नाव कृष्णाजी केशव दामले. अल्पायुष्यात त्यांनी केलेली काव्यनिर्मिती संख्येने मर्यादित असली, तरी तिचा प्रभाव मात्र मराठी साहित्यावर अत्यंत व्यापक आणि दीर्घकाळ टिकणारा ठरला. केशवसुतांचा जन्म ७ ऑक्टोबर १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड येथे झाला. त्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती परंपरांनी बांधलेली होती. समाजात अनेक रूढी, अंधश्रद्धा आणि विषमता होती. अशा वातावरणात केशवसुतांच्या कवितेने नव्या विचारांचा, स्वातंत्र्याचा, समतेचा आणि परिवर्तनाचा आवाज बुलंद केला. त्यामुळेच ते केवळ कवी राहिले नाहीत, तर मराठी समाजाच्या वैचारिक परिवर्तनाचे अग्रदूत ठरले. सामान्य माणूस, समाजातील विषमता, स्वातंत्र्याची आकांक्षा, निसर्ग, मानवी स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तन या विषयांना त्यांनी कवितेत स्थान दिले. त्यांच्या कवितेतील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे जुन्या रूढी-परंपरांना दिलेले आव्हान. 'तुतारी' ही त्यांची कविता याचे उत्तम उदाहरण आहे. तुतारीच्या प्रतीकातून त्यांनी समाजाला जागे होण्याचे आणि परिवर्तनासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

एक तुतारी द्या मज आणुनी,
फुंकीन जी मी स्वप्राणांनी!

या ओळी केवळ काव्यपंक्ती नाहीत, तर नव्या युगाचा घोष आहेत. समाजातील जडत्व झटकून नव्या विचारांचे स्वागत करण्याची प्रेरणा त्यातून मिळते. आजच्या काळातही 'तुतारी'चे महत्त्व कमी झालेले नाही. समाजात सामाजिक विषमता, भ्रष्टाचार, अन्याय आणि असंवेदनशीलता दिसून येते. अशा वेळी केशवसुतांची तुतारी पुन्हा एकदा वाजण्याची गरज आहे. त्यांच्या कवितेतील क्रांती ही केवळ राजकीय क्रांती नव्हती. ती विचारांची आणि मानसिकतेची क्रांती होती. माणसाने प्रश्न विचारावेत, अन्यायाला विरोध करावा आणि स्वतःच्या विवेकबुद्धीचा वापर करावा, असा संदेश त्यांच्या काव्यातून जाणवतो. केशवसुतांच्या 'नवा शिपाई' या कवितेतही परिवर्तनाची भावना प्रकर्षाने जाणवते. येथे 'शिपाई' हा केवळ सैनिक नसून नव्या विचारांचा सैनिक आहे. तो अन्याय, अज्ञान आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतो. ही कविता वा-चताना आजच्या तरुण पिढीचा विचार करावासा वाटतो. समाजपरिवर्तनासाठी केवळ शासन किंवा व्यवस्था जबाबदार नसते; प्रत्येक जागरूक नागरिकाची त्यात भूमिका असते. केशवसुतांचा 'नवा शिपाई' आजच्या तरुणाईला विवेक, धैर्य आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश देतो. केशवसुतांच्या काव्यात निराशेपेक्षा आशावाद अधिक दिसतो. अडचणी कितीही असल्या तरी माणसाने पुढे जाण्याची प्रेरणा जपली पाहिजे, असा त्यांच्या कवितेचा सूर आहे. म्हणूनच त्यांची कविता आजही वाचकाला अंतर्मुख करण्याबरोबरच कृतीची प्रेरणाही देते. त्यांच्या काव्याचा आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे निसर्गाकडे पाहण्याची आधुनिक दृष्टी. निसर्ग हा केवळ सौंदर्याचा विषय नसून मानवी मनाशी संवाद साधणारा घटक आहे, अशी जाणीव त्यांच्या कवितेतून दिसते. 'झपूर्झा' ही केशवसुतांची एक वैशिष्ट्यपूर्ण कविता. तिच्या लयीमध्ये आणि प्रतिमांमध्ये एक वेगळे काव्यविश्व अनुभवायला मिळते. 'झपूर्झा' हा शब्दच एका गूढ, आनंददायी आणि मुक्त भावविश्वाची अनुभूती देतो. त्यांच्या कवितेत कल्पनाशक्ती, लय आणि विचार यांचा सुंदर मिलाफ आढळतो.केशवसुतांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी कवितेला समाजाशी जोडले. कवीने केवळ निसर्गाचे वर्णन किंवा प्रेमभावना व्यक्त न करता आपल्या काळातील प्रश्नांवर भाष्य केले पाहिजे, ही भूमिका त्यांनी आपल्या लेखनातून वेळोवेळी दाखवून दिली आहे. समाजातील विषमता, अज्ञान आणि जुनाट विचारसरणी यांना त्यांनी आव्हान दिले. त्यामुळे त्यांच्या कवितेत मानवमुक्तीची आकांक्षा दिसून येते. त्यांचा आधुनिकतावाद हा केवळ पाश्चात्त्य प्रभावातून आलेला नव्हता; तो भारतीय समाजातील वास्तव समजून घेण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झाला होता.

आज आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात जगत असलो, तरी सामाजिक प्रश्न संपलेले नाहीत. डिजिटल युगात माहिती प्रचंड वाढली आहे; पण विवेक वाढला आहे का, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. सोशल मीडिया, अफवा, आणि सामाजिक विषमता यांसारख्या समस्यांसमोर केशवसुतांचा विवेकवादी आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन आजही मार्गदर्शक ठरतो. त्यांची 'तुतारी' आज भ्रष्टाचाराविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आणि सामाजिक विषमतेविरुद्ध वाजली पाहिजे. 'नवा शिपाई' आज प्रत्येक जबाबदार नागरिकामध्ये निर्माण झाला पाहिजे. केशवसुतांचे महत्त्व केवळ त्यांच्या कवितांच्या संख्येत नाही, तर त्यांनी मराठी कवितेला दिलेल्या नव्या दिशेत आहे. त्यांच्या पश्चात आलेल्या अनेक कवींना त्यांच्या विचारांचा आणि काव्यशैलीचा प्रभाव जाणवला. आधुनिक मराठी कवितेच्या प्रवाहाला त्यांनी जी सुरुवात करून दिली, ती पुढे विविध कवींनी समृद्ध केली. कवी केशवसुतांचे आयुष्य अल्प होते; परंतु त्यांची काव्यदृष्टी दीर्घायुषी ठरली. त्यांनी आपल्या कवितेतून समाजाला जागे केले, नव्या विचारांचे स्वागत करण्याचे धैर्य दिले आणि परिवर्तनाची आस निर्माण केली. आज त्यांच्या स्मृतीकडे पाहताना केवळ एका महान कवी म्हणून स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या कवितेतील प्रश्न, विचार आणि परिवर्तनाची हाक आपण आपल्या जीवनात किती स्वीकारतो, हे अधिक महत्त्वाचे आहे.

केशवसुतांची कविता म्हणजे मराठी मनाला मिळालेली आधुनिकतेची पहाट आहे. त्यांच्या लेखणीने मराठी कवितेला नवा आत्मा दिला आणि समाजाला विचार करण्याची नवी दृष्टी दिली. म्हणूनच कवी केशवसुत हे केवळ आधुनिक मराठी कवितेचे जनक नव्हेत, तर विचारजागृतीचे आणि सामाजिक परिवर्तनाचे शाश्वत कवी आहेत. केशवसुतांचे निधन ७ नोव्हेंबर १९०५ रोजी झाले. मृत्युपश्चात त्यांच्या कवितेबद्दल गुणग्राहक व प्रशंसापर अनेक लेख लिहिले गेले. अनेक कविताकारांनी त्यांना गुरुस्थानी ठेवले. त्यांना आधुनिक काव्याचे जनक मानले गेले. त्यांच्या काव्यापासून प्रेरणा घेऊन पुढील काळात 'आधुनिक मराठी काव्यात' कितीतरी परिवर्तने व प्रयोग झाले. महाराष्ट्राच्या काव्य परंपरेत 'केशवसुत' हे नाव आता अजरामर आहे. महाराष्ट्र शासनातर्फे १९६६ मध्ये केशवसुतांची जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली व या समितीकडून केशवसुतांच्या काव्यसंग्रहाच्या हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती १९६७ मध्ये प्रकाशित केली गेली. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या प्रयत्नातून केशवसुतांच्या जन्मगावी मालगुंड येथे स्मारक उभारण्यात आले व या स्मारकाचे उद्घाटन ८ मे १९९४ रोजी झाले.

**-जगन घाणेकर,**
मु. पो. मालगुंड, ता. जि. रत्नागिरी
मो. ९६६४५५९७८०

# शाळेत शिक्षण हवे, आजारांना आमंत्रण नव्हे!

शाळा म्हणजे केवळ चार भिंती, फळा, बाके आणि पाठ्यपुस्तके नव्हेत. शाळा ही मुलांच्या भवितव्याची पायाभरणी करणारी जागा आहे. येथे मुलांना ज्ञान मिळते, संस्कार मिळतात, आत्मविश्वास मिळतो आणि आयुष्य घडविण्याची संधी मिळते. पण याच शाळेत एखाद्या मुलाला साधे स्वच्छ पाणी प्यायला मिळत नसेल, स्वच्छतागृह उपलब्ध नसेल किंवा मूलभूत स्वच्छतेची व्यवस्था नसेल, तर आपण नेमके कोणत्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची भाषा करतो आहोत, हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे.

डब्ल्यूएचओ आणि युनिसेफच्या संयुक्त देखरेख कार्यक्रमाच्या अहवालाने भारताच्या शिक्षणव्यवस्थेसमोर अत्यंत गंभीर प्रश्न उभा केला आहे. २०२५ मध्ये जगभरातील २४.४ कोटी मुले शाळांमधील स्वच्छता सुविधांपासून वंचित होती. त्यापैकी सुमारे पाच कोटी मुले भारतातील आहेत. म्हणजे जगातील अशा सुविधांपासून वंचित असलेल्या मुलांमध्ये भारताचा वाटा अत्यंत मोठा आहे. विशेष म्हणजे २०१५ ते २०२५ या काळात भारतात स्वच्छता सुविधा नसलेल्या शाळांच्या संख्येत १४ टक्क्यांनी घट झाली असली, तरी अजूनही कोट्यवधी मुले मूलभूत सुविधांपासून दूर आहेत. प्रगती झाली आहे; पण ती पुरेशी नाही, हे या आकडेवारीचे खरे गांभीर्य आहे.



याहून चिंताजनक बाब म्हणजे सुमारे १.२ कोटी मुलांना शाळेत मूलभूत पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. पाणी ही सुविधा नसून जीवनाची गरज आहे. एखाद्या मुलाने शाळेत दिवसभर राहायचे आणि त्याला सुरक्षित पिण्याचे पाणी मिळायचे नाही, ही परिस्थिती कोणत्याही विकसित किंवा विकासाच्या मार्गावर असलेल्या समाजाला शोभणारी नाही. स्वच्छतागृहांचा प्रश्न तर त्याहून व्यापक आहे. विशेषतः किशोरवयीन मुलींसाठी स्वच्छ, सुरक्षित, स्वतंत्र आणि वापरण्यायोग्य स्वच्छतागृह ही त्यांच्या शिक्षणातील सातत्याशी जोडलेली गरज आहे. स्वच्छतागृह नसणे, ते असले तरी पाणी नसणे किंवा वापरण्यायोग्य स्थितीत नसणे, याचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर आणि शाळेतील अनुभवावर होऊ शकतो. त्यामुळे 'शाळेत स्वच्छतागृह आहे का?' एवढाच प्रश्न पुरेसा नाही; ते स्वच्छ आहे का, पाणी उपलब्ध आहे का, मुला-मुलींसाठी स्वतंत्र आहे का आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वापरण्यायोग्य आहे का, हेही तपासावे लागेल.

आज आपण डिजिटल शिक्षण, स्मार्ट क्लासरूम, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट आणि आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाबद्दल बोलत आहोत. हे आवश्यक आहेच. पण एका बाजूला मुलाच्या हातात टॅबलेट देताना दुसऱ्या बाजूला त्याला पिण्यासाठी सुरक्षित पाणी मिळत नसेल, तर विकासाच्या प्राधान्यक्रमांवर पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. संगणक आणि इंटरनेट महत्त्वाचे आहेत; पण त्यापूर्वी स्वच्छ पाणी, स्वच्छतागृह आणि स्वच्छ परिसर या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांसाठी पाणी व स्वच्छता यांना स्वतंत्र महत्त्व देण्यात आले आहे. ही दोन्ही उद्दिष्टे प्रत्यक्षात मात्र एकमेकांपासून वेगळी नाहीत. निरोगी शरीर आणि सुरक्षित वातावरणाशिवाय गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कल्पना अपुरी आहे. मुलांच्या शिक्षणाचा हक्क म्हणजे केवळ शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क नव्हे; तर सन्मानाने, सुरक्षितपणे आणि आरोग्यदायी वातावरणात शिकण्याचाही हक्क आहे.

यासाठी केवळ सरकारी योजना जाहीर करून चालणार नाही. शाळानिहाय वास्तव तपासले पाहिजे. पाण्याचे स्रोत कार्यरत आहेत का, पाणी सुरक्षित आहे का, स्वच्छतागृहांची नियमित साफसफाई होते का, मुलींसाठी आवश्यक सुविधा आहेत का, हात धुण्यासाठी पाणी व साबण उपलब्ध आहे का, याची नियमित पाहणी झाली पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा व्यवस्थापन समित्या, पालक आणि शिक्षक यांना या प्रक्रियेत सहभागी करून घेतले पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्रश्नाकडे केवळ पायाभूत सुविधांचा प्रश्न म्हणून पाहता कामा नये. हा मुलांच्या आरोग्याचा, सन्मानाचा आणि शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न आहे. शाळेतील एका नळातून येणारे स्वच्छ पाणी कदाचित एखाद्या मोठ्या प्रकल्पाइतके आकर्षक दिसणार नाही; परंतु त्या पाण्यामुळे एखादे मूल निरोगी राहते, नियमित शाळेत जाते आणि शिक्षण पूर्ण करते, तर त्याचे सामाजिक मूल्य प्रचंड आहे.

भारताला ज्ञानशक्ती बनवायचे असेल, तर प्रत्येक मुलाला प्रथम निरोगी आणि सुरक्षित शिक्षणाचे वातावरण द्यावे लागेल. शाळेच्या भिंतींवर रंगरंगोटी करण्यापेक्षा त्या भिंतींच्या आत मुलांना स्वच्छ पाणी आणि स्वच्छतागृह मिळते आहे का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. शाळेत मुलांच्या हातात पुस्तक असावे, पाण्याची रिकामी बाटली नव्हे; त्यांच्या डोळ्यांसमोर स्वप्ने असावीत, अस्वच्छतेची भीती नव्हे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुरुवात वर्गखोलीत नाही, तर स्वच्छ पाणी आणि स्वच्छ शाळेपासून होते.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली

# ग्रंथालये बंद होणे म्हणजे वाचन संस्कृतीसमोरील मोठे आव्हान



महाराष्ट्राला संत, साहित्यिक, विचारवंत आणि सम ाजसुधारकांची समृद्ध परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू म हाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, साने गुरुजी यांच्यासारख्या अनेक महान व्यक्तींनी सम ाजाच्या वैचारिक जडणघडणीत वाचन आणि ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. पुस्तक हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून माणसाला विचार करायला शिकवणारे, प्रश्न विचारण्याची ताकद देणारे आणि समाजाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी देणारे माध्यम आहे. त्याम ुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची घटती संख्या ही केवळ एका संस्थेची समस्या नसून आपल्या वाचन संस्कृतीसमोरील गंभीर आव्हान आहे.

राज्य ग्रंथालय संचालनालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्रातील ९९३ मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालये बंद झाली आहेत, ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. २०२२ मध्ये राज्यात १२ हजार १४९ सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत होती. त्यानंतर ही संख्या सातत्याने कमी होत गेली आणि २०२४ अखेरपर्यंत कार्यरत ग्रंथालयांची संख्या सुमारे ११ हजार १५० वर आली. आकडेवारीकडे केवळ संख्येच्या दृष्टीने पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक बंद झालेले ग्रंथालय म्हणजे त्या परिसरातील विद्यार्थी, तरुण, ज्येष्ठ नागरिक, शिक्षक, साहित्यप्रेमी आणि सामान्य वाचकांसाठी उपलब्ध असलेले एक ज्ञानकेंद्र कमी होणे होय.

सार्वजनिक ग्रंथालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी खुले असते. आर्थिक परिस्थिती चांगली असो किंवा सामान्य असो, प्रत्येकाला तेथे पुस्तके वाचण्याची संधी मिळते. विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालये अत्यंत महत्त्वाची आहेत. महागडी पुस्तके विकत घेणे अनेक विद्यार्थ्यांना शक्य नसते. अशा वेळी ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, स्पर्धा परीक्षांची पुस्तके, वर्तमानपत्रे आणि नियतकालिके त्यांच्या शिक्षणाला मोठी मदत करतात.

अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या मदतीने स्पर्धा परीक्षांची तयारी केली आहे. काहींनी अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले, तर काहींनी साहित्य, पत्रकारिता, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले. त्यामुळे ग्रंथालय बंद होणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या एका महत्त्वाच्या दारावर कुलूप लागण्यासारखे आहे.

आजच्या काळात केवळ कपाटांमध्ये पुस्तके ठेवणे पुरेसे राहिलेले नाही. वाचकांना संगणक, इंटरनेट, डिजिटल संदर्भसाहित्य, ई-बुक्स आणि ऑनलाइन माहितीचीही गरज आहे. मात्र अनेक ग्रंथालयांमध्ये संगणकीकरण आणि इंटरनेटची सुविधा अद्याप पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. परिणामी आधुनिक पिढीतील अनेक तरुण ग्रंथालयांपासून दूर जात आहेत. दुसरीकडे, मोबाईल आणि सोशल मीडियामुळे माहिती सहज उपलब्ध होत आहे. त्यामुळे पुस्तक हातात घेऊन शांतपणे वाचण्याची सवय कमी होत असल्याचे चित्र दिसते. माहिती मिळवणे सोपे झाले असले तरी माहितीचे आकलन, विश्लेषण आणि चिकित्सक विचार करण्यासाठी सखोल वाचनाची गरज कायम आहे. सोशल मीडियावरील छोट्या संदेशांमधून मिळणारी माहिती आणि पुस्तकातून मिळणारे सखोल ज्ञान यामध्ये मोठा फरक आहे. डिजिटल युगामुळे ग्रंथालयांचे स्वरूप बदलण्याची गरज निर्माण झाली आहे; मात्र त्यांचे म हत्त्व कमी झालेले नाही. उलट, डिजिटल साधनांचा योग्य वापर करून ग्रंथालये अधिक प्रभावी बनवता येऊ शकतात.

आज ग्रंथालयात पारंपरिक पुस्तकांसोबत ई-बुक्स, डिजिटल संग्रह, ऑनलाइन नियतकालिके, स्पर्धा परीक्षांचे डिजिटल साहित्य, शैक्षणिक व्हिडिओ आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देता येतात. विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरणे, शैक्षणिक माहिती शोधणे आणि विविध परीक्षांसाठी डिजिटल अभ्याससाहित्य मिळवून देणे शक्य आहे. म्हणून मोबाईल आणि इंटरनेट हे ग्रंथालयांचे प्रतिस्पर्धी न मानता त्यांना ग्रंथालयाच्या ज्ञानप्रसाराचे आधुनिक साधन बनवणे आवश्यक आहे. 'पुस्तकालय ते डिजिटल ज्ञानालय' असा प्रवास करण्याची हीच योग्य वेळ आहे.

आज अनेक मुलांच्या आणि तरुणांच्या हातात मोबाईल आहे; परंतु त्याच हातात पुस्तक किती वेळ असते, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. सततच्या मोबाईल वापरामुळे एकाग्रतेने वाचण्याची सवय कमी होत आहे. सोशल मीडिया, मनोरंजनाचे विविध पर्याय आणि झटपट माहितीच्या संस्कृतीमुळे सखोल वाचनासाठी वेळ देण्याची प्रवृत्ती कमी होत आहे. वाचन माणसाला केवळ माहिती देत नाही, तर त्याची भाषा समृद्ध करते, कल्पनाशक्ती वाढवते, विचारशक्ती विकसित करते आणि संवेदनशीलता वाढवते. चांगले साहित्य वाचणारा समाज अधिक चिकित्सक, संवेदनशील आणि विवेकी बनतो. त्यामुळे वाचनाची सवय कमी होणे ही भविष्यातील पिढीच्या बौद्धिक विकासासाठी चिंतेची बाब आहे.

ग्रंथालयांना केवळ इमारत आणि पुस्तके देऊन काम पूर्ण होत नाही. तेथे प्रशिक्षित कर्मचारी, वाचकांसाठी चांगले वातावरण, स्वच्छता, प्रकाशव्यवस्था, बसण्याची सुविधा, संगणक, इंटरनेट आणि आधुनिक संदर्भसाहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील ग्रंथालयांसाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करणे गरजेचे आहे. ज्या ग्रंथालयांमध्ये वाचकसंख्या वाढविण्याची क्षमता आहे, अशा ग्रंथालयांना अतिरिक्त प्रोत्साहन दिले पाहिजे. ग्रंथालये केवळ पुस्तके घेऊन वाचण्याची ठिकाणे न राहता ती स्थानिक सांस्कृतिक आणि वैचारिक केंद्रे बनली पाहिजेत. पुस्तक प्रदर्शन, लेखकांशी संवाद, काव्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा, पुस्तक चर्चा, व्याख्याने आणि विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करता येतील. गावातील ज्येष्ठ नागरिकांनी आपला अनुभव तरुणांपर्यंत पोहोचवावा, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनासाठी प्रोत्साहित करावे आणि पालकांनी मुलांच्या हातात पुस्तक देण्याची सवय लावावी. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ग्रंथालये यांच्यात समन्वय निर्माण झाल्यास वाचन चळवळीला मोठी चालना मिळू शकते.

ज्या ग्रंथालयांना आर्थिक किंवा व्यवस्थापनाच्या कारणामुळे बंद व्हावे लागले आहे, त्यांचा स्वतंत्र आढावा घेणे आवश्यक आहे. शक्य असलेल्या ग्रंथालयांना स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, उद्योग आणि नागरिकांच्या सहकार्याने पुन्हा सुरू करता येईल. 'एक गावएक ग्रंथालय' किंवा 'प्रत्येक गावात सुसज्ज वाचनालय' ही संकल्पना व्यापक पातळीवर राबविण्याची गरज आहे. समाजातील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी वाढदिवस, स्मृतिदिन किंवा इतर कार्यक्रमांवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी ग्रंथालयांना पुस्तके आणि आवश्यक साहित्य देण्याची संस्कृती निम ाण केली तर त्याचा मोठा फायदा होऊ शकतो.

ग्रंथालये टिकवण्याची जबाबदारी केवळ शासनाची नाही. वाचकांचीही तितकीच जबाबदारी आहे. ग्रंथालयात जाऊन पुस्तके वाचणे, पुस्तकांची काळजी घेणे, नवीन पुस्तकांची मागणी करणे आणि इतरांना वाचनासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. प्रत्येक कुटुंबाने महिन्यात किमान एक पुस्तक वाचण्याचा संकल्प केला, प्रत्येक शाळेने नियमित वाचन तास घेतला आणि प्रत्येक गावाने आपल्या ग्रंथालयाला सक्रिय केले तर वाचन संस्कृतीला नवसंजीवनी मिळू शकते.

महाराष्ट्रात ९९३ सार्वजनिक ग्रंथालये बंद होणे ही भविष्यासाठी धोक्याची घंटा समजली पाहिजे. मात्र या परिस्थितीकडे केवळ निराशेने पाहण्याची गरज नाही. योग्य नियोजन, पुरेसा निधी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि समाजाचा सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळीला पुन्हा बळकटी देता येऊ शकते. ग्रंथालये ही समाजाची वैचारिक मंदिरे आहेत. त्यांच्या दारावर कुलूप लागणे म्हणजे केवळ एका इमारतीचे दार बंद होणे नव्हे, तर ज्ञानाकडे जाणारा एक मार्ग बंद होणे आहे. त्यामुळे बंद पडणारी ग्रंथालये वाचवणे आणि नव्या पिढीला पुस्तकांशी जोडणे ही आजची अत्यंत महत्त्वाची सामाजिक गरज आहे. मोबाईलच्या पडद्यापलीकडेही एक मोठे जग आहे आणि ते जग पुस्तकांच्या पानांमध्ये दडलेले आहे. त्या पानांशी नव्या पिढीची मैत्री झाली तरच महाराष्ट्राची समृद्ध वाचन परंपरा पुढे चालू राहील. ग्रंथालये वाचली तर वाचन संस्कृती वाचेल; वाचन संस्कृती वाचली तर समाजाची वैचारिक समृद्धी आणि लोकशाहीची जाणीव अधिक मजबूत होईल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# ‘आजचे शिक्षण माणूस घडविण्यास सक्षम आहे/नाही’ विषयावर रंगली वैचारिक चुरस

## स्वामी रामानंद तीर्थ जयंतीनिमित्त पीपल्स कॉलेजमध्ये राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या पीपल्स कॉलेज, नांदेड द्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

यंदाच्या स्पर्धेसाठी ‘आजचे शिक्षण माणूस घडविण्यास सक्षम आहे/नाही’ हा समकालीन आणि विचारप्रवर्तक विषय देण्यात आला होता. विविध महाविद्यालयांतील स्पर्धकांनी विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाजू अभ्यासपूर्ण आणि प्रभावीपणे मांडल्या. आजच्या शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप, मूल्यशिक्षणाची आवश्यकता, तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव, रोजगाराभिमुख शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, सामाजिक बांधिलकी तसेच व्यक्तिमत्त्व आणि चारित्र्य घडविण्यात शिक्षणाची भूमिका अशा विविध पैलूंवर स्पर्धकांनी विवेचन केले.




स्पर्धेचे उद्घाटन नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव श्यामल पत्की यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, आजच्या शिक्षणातून केवळ ज्ञानसंपन्न नव्हे, तर संवेदनशील आणि सामाजिक भान असलेला नागरिक घडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये मानवी संवेदना, मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी रुजविणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा वैचारिक स्पर्धांचे आयोजन असल्याचे नमूद करीत पीपल्स कॉलेजने वैचारिक परंपरा या माध्यमातून जपून ठेवल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेला चालना देणे, समकालीन प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची वृत्ती विकसित करणे आणि प्रभावी वक्तृत्वासाठी राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उद्देश असल्याचे प्रस्ताविकात स्पर्धेचे समन्वयक डॉ. डी. एन. मोरे यांनी सांगितले. आभार उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे यांनी मानले.

बक्षीस वितरण समारंभास संस्थेचे माजी अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. व्यंकटेश काबदे, विद्यमान अध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील, संस्थेचे पदाधिकारी ॲड. प्रफुल्ल अग्रवाल, कॉ. नागापूरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे, स्पर्धा समन्वयक डॉ. डी. एन. मोरे आणि प्रा. कल्पना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेच्या बक्षिसाचे प्रायोजकत्व प्रा. कल्पना जाधव यांनी स्वीकारले होते.

यावेळी मान्यवरांनी पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राष्ट्रउभारणीतील योगदानाचे स्मरण केले. शिक्षण हे केवळ पदवी आणि रोजगारापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये विवेक, मूल्यनिष्ठा, सामाजिक जाणीव आणि जबाबदार नागरिकत्व निर्माण करणारे असावे, असा विचार यावेळी व्यक्त करण्यात आला.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. सूर्यप्रकाश जाधव, डॉ. धोंडिबा भुरे आणि डॉ. संदीप काळे यांनी काम पाहिले. विषयाचे ज्ञान व मांडणी, वक्तृत्व व संवादकौशल्य, सादरीकरण कौशल्य, मुद्द्यांचे खंडन, आत्मविश्वास आणि देहबोली आदी निकषांच्या आधारे स्पर्धकांचे मूल्यमापन करण्यात आले.

स्पर्धेच्या अंतिम निकालात यशवंत महाविद्यालय, नांदेडने प्रथम क्रमांक पटकावला. नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेडने द्वितीय क्रमांक, तर सहयोग सेवाभावी संस्थेच्या कॉलेज ऑफ एज्युकेशनने तृतीय क्रमांक मिळविला. आदर्श महाविद्यालय, हिंगोलीला उत्तेजनार्थ पारितोषिक प्रदान करण्यात आले. विजेत्या संघांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

# शेळगावच्या विकासासाठी आयुष्य वेचणाऱ्या समाजसेवकाला शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली

## ‘माधवराव पाटील शेळगावकर यांचे कार्य पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी’



**नायगाव (प्रतिनिधी)–** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता समितीचे महाराष्ट्रातील पहिले अध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक तथा शेळगाव (गौरी) च्या सर्वांगीण विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे स्व. माधवराव पाटील शेळगावकर यांच्या निधनाने समाजाभिमुख, पुरोगामी आणि ग्रामविकासाची दूरदृष्टी असलेले नेतृत्व हरपले आहे. स्वच्छता, शिक्षण, सामाजिक समता, व्यसनमुक्ती आणि ग्रामविकासाच्या माध्यमातून त्यांनी शेळगावच्या विकासाला नवी दिशा दिली. त्यांनी रुजविलेले संस्कार, सामाजिक बांधीलकी आणि ग्रामविकासाची विचारधारा पुढील पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील, अशा भावना शोकसभेत व्यक्त करण्यात आल्या.

स्व. माधवराव पाटील शेळगावकर यांच्या निधनानिमित्त रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायतीने घेतलेल्या पुढाकाराचे घेण्यात आलेल्या आयोजित शोकसभेत कृषी मूल्य आयोगाचे सदस्य गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी कौतुक केले. यावेळी शेळगावचे सरपंच तथा मुखेड येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालयाचे डॉ. प्रा. मनोहर तोटरे तसेच स्व. माधवराव पाटील यांचे सुपुत्र संजय पाटील शेळगावकर यांनी त्यांच्या कार्याला उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी स्व. माधवराव पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, शेळगावच्या विकासाला केवळ भौतिक सुविधांची जोड न देता त्यांनी गावकऱ्यांमध्ये स्वाभिमान, एकजूट आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचे काम केले. स्वच्छता, शिक्षण, पाणी, रस्ते तसेच विविध मूलभूत सुविधांसाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला. ग्रामस्थांना सोबत घेऊन विकासकामे करण्याची त्यांची कार्यपद्धती हीच त्यांच्या नेतृत्त्वाची खरी ओळख होती.

संत गाडगेबाबांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी ग्रामस्वच्छतेला केवळ अभियान न ठेवता ती गावाच्या जीवनशैलीचा भाग बनविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शेळगाव (गौरी) ला आदर्श गाव म्हणून ओळख मिळाली. गावाच्या विकासासाठी त्यांनी निर्माण केलेली सकारात्मक ऊर्जा आणि विकासाची दिशा पुढे नेणे, हीच स्व. माधवराव पाटील यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे हंगरगेकर यांनी नमूद केले.

# नवीन नांदेड भागातील स्कूलबस चालकांवर प्रादेशीक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून होणारी कार्यवाही शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गिरडे यांच्या समन्वयातून थांबली

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नवीन नांदेड भागातील स्कूलबस चालकांवर प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून होणारी कार्यवाही शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील यांच्या समन्वयाने थाबली आहे.



क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या स्कूल बसेसवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येणार होती. परंतु ही कार्यवाही तत्काळ थांबावी यासाठी शिवसेनेचे नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या नेतृत्वाखाली प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे परिवहन अधिकारी शाहु यांच्यासमवेत स्कूल बसचालकांत झालेल्या बैठकीनंतर दंडात्मक कार्यवाही थांबविण्याचे आश्वासन दिल्यामुळे स्कूलबस चालकांनी आभार व्यक्त केले.

नवीन नांदेड भागातील शेकडो स्कूलबस चालकांना गेल्या २० दिवसांपासून प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेडच्या वतीने दंडात्मक कार्यवाही होत असल्याने व त्यातला त्यात दंडात्मक कार्यवाही होत असल्याने स्कूल बस चालक संभ्रमात होते तर काही चालकांनी आपला उदरनिर्वाह अवलंबून असल्याने व कार्यवाही होत असल्याने संतप्त झाले होते, अखेर शिवसेनेचे नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्याशी संबंधित स्कूल बस चालकांनी भेट घेऊन चर्चा केली.

अखेर प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड येथे ३० सप्टेंबर २६ रोजी परिवहन अधिकारी शाहु व संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर समन्वयानंतर ही कार्यवाही तत्काळ पाठीमागे घेण्यात आली.

२ सप्टेंबर रोजी नवीन नांदेड भागातील शेकडो स्कूलबस चालकांनी नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या संपर्क कार्यालयात फटाक्यांची आतीषबाजी करून विनय पाटील गिरडे यांचा सत्कार करून मिठाई वाटप केली. गेल्या २० दिवसांपासून सुरू असलेली ही कार्यवाही थांबल्याने सुटकेचा श्वास घेतला व आनंदाचे वातावरण दिसून आले.

यावेळी स्कूल बस चालक पांडुरंग गिरडे, अरविंद इंगळे, बालाजी वाघ, आनंदराव शिंदे, अनिल भारती, वाघमारे मामा, केशव पाटील, संतोष मेडेवार, शिवाजी मोरे, कवाळे पाटील, संदीप देशपांडे, भीमराव सोनकांबळे, अंकुलवार सावकार, जाधव पाटील, गिरीश जाधव, बालाजी वासरीकर, दत्ता बोकारे, कदम पाटील, देवी मिश्रा, विजय शिवपुजे, शिवा मळगे यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

# सिटू संलग्न घर कामगार संघटनेतर्फे विविध मागण्यांसाठी काढण्यात आला धडक मोर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील घरेलू कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सिटू संलग्न घर कामगार संघटनेतर्फे सोमवार, दि. ५ ऑक्टोबर महात्मा फुले पुतळा, आयटीआय कॉर्नर येथून सहायक कामगार आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.




महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम २००८ अंतर्गत असलेल्या जुन्या आणि नव्याने लागू झालेल्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, पात्र कामगारांना प्रत्यक्ष लाभ मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील अनेक घरेलू कामगारांना योजनांची पुरेशी माहिती मिळत नसून पात्र असतानाही लाभ मिळवताना अडचणी येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सन्मानधन योजनेचा लाभ नियमित मिळावा, नोंदणी व नुतनीकरण प्रक्रिया सुलभ करावी, विशेष नोंदणी मोहीम राबवावी, तसेच अपघात, मृत्यू, अंत्यविधी, प्रसूती, शिक्षण व इतर योजनांची तालुकानिहाय जनजागृती करावी, अशी मागणी करण्यात आली.

महिला कामगारांना प्रसूती लाभ वेळेत मिळावा, कामगारांच्या मुलांना शैक्षणिक व कौशल्य विकास योजनांचा लाभ मिळावा, संसारोपयोगी साहित्य व भांड्यांचे वितरण पारदर्शक पद्धतीने करावे आणि अर्जांवरील विलंब टाळण्यासाठी कार्यालयात स्वतंत्र हेल्प डेस्क सुरू करावा, अशी मागणीही करण्यात आली.

घरेलू कामगारांच्या अर्जांमध्ये अनधिकृत फेरफार, खोटी माहिती, बनावट कागदपत्रांचा वापर किंवा पात्र लाभार्थ्यांऐवजी इतरांची नावे दाखवल्याचे प्रकार समोर आले असून, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी संघटनेने केली.

कामगार उपआयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या पत्रात नमूद असलेल्या ८९४ प्रकरणांतील कथित अनियमिततेची स्वतंत्र व सखोल चौकशी करावी. या प्रकरणांशी संबंधित ९२६ लाभ अर्जांपैकी मंजूर झालेल्या ५८९ अर्जांची विशेष तपासणी करून वितरित झालेल्या ७९ लाख ६९ हजार रुपयांपैकी अपात्र व बेकायदेशीररित्या वाटप झालेली रक्कम वसूल करून दोषींवर कारवाई करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

या मोर्चाचे नेतृत्व संघटनेचे अध्यक्ष कॉ. गंगाधर गायकवाड, कार्याध्यक्ष कॉ. उज्वला पडलवार, सरचिटणीस कॉ. करवंदा गायकवाड, जिमसं जिल्हाध्यक्ष कॉ. लता गायकवाड, सुभाषचंद्र गजभारे, मंगेश वट्टेवाड, राहुल नरवाडे, अरुणा जोगदंड, मंदा नेहारे, सुरेखा कांबळे यांनी केले.

# स्काऊट-गाईड प्रशिक्षण शिबिरात ग्राहक प्रबोधन व्याख्यान संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग तसेच नांदेड भारत स्काऊट आणि गाईडस् जिल्हा कार्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक व प्रगत प्रशिक्षण ७ दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विजयनगर येथील हनुमान मंदिर मंगल कार्यालयात सुरू असलेल्या या शिबिरात सहभागी शिक्षकवृंदांसाठी ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत विशेष प्रबोधन व्याख्यान पार पडले.

नांदेड जिल्हा स्काऊट गाईडच्या आयुक्त श्रीमती भागीरथी बच्चेवार यांच्या निमंत्रणावरून ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे मराठवाडा विभाग संघटक इंजिनिअर बालाजी लांडगे आणि नांदेड जिल्हाध्यक्ष डॉ. सायन्ना मठमवार यांनी उपस्थित राहून शिबिरातील सहभागी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमप्रसंगोपात्त्य दोन्ही प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून देण्यात आला. आपल्या प्रबोधनपर भाषणात डॉ. सायन्ना मठमवार यांनी ग्राहकांचे मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि दैनंदिन जीवनातील जागरूकतेचे महत्त्व यावर सविस्तर माहिती दिली.

यानंतर इंजिनिअर बालाजी लांडगे यांनी ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संघटनेच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला. ग्राहक आणि विद्यार्थी ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे सांगून ते म्हणाले, शाळा व महाविद्यालयांमधून विद्यार्थी ग्राहक जागरण व्याख्यानांच्या माध्यमातून सातत्याने प्रबोधन केले जाते. फसवणूक झाल्यास संघटनेच्या ‘ग्राहक मार्गदर्शन सेवा केंद्रा’च्या माध्यमातून ग्राहकांना दिलासा व योग्य कायदेशीर मार्गदर्शन करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

# पीपल्स कॉलेजच्या माजी विद्यार्थिनी गोंडवाना विद्यापीठाची उत्कृष्ट अधिसभा सदस्य म्हणून सन्मानित

**नांदेड (प्रतिनिधी)–** चिंतामणी महाविद्यालय, पोंभूर्णा जि. चंद्रपूर येथे सहयोगी प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शीला उपकार नरवाडे (सूर्यतळे) यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीतर्फे सत्र २०२५-२६ करिता उत्कृष्ट अधिसभा सदस्य म्हणून पुरस्कृत करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या पंधराव्या वर्धापन दिनानिमित्ताने डॉ. अतुल वैद्य, मा. कुलगुरू, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर तसेच अविश्यांत पंडा, जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या उपस्थितीत आणि गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



प्रा. डॉ. शीला उपकार नरवाडे (कु. शीला दत्ता सूर्यतळे) ह्या पीपल्स कॉलेज, नांदेड येथील सत्र २०००-२००२ च्या M. A. (English) च्या माजी विद्यार्थिनी आहेत. यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा अर्धापूर येथून, माध्यमिक शिक्षण मनोविकास माध्यमिक शाळा, कंधार येथून, उच्च माध्यमिक शिक्षण सरस्वती विद्यालय वसमत आणि बहिर्जी उच्च माध्यमिक विद्यालय, वसमत येथून पूर्ण केले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी १२ वीचे शिक्षण विज्ञान शाखेतून घेऊनही पुढे त्यांनी पदवीचे शिक्षण कला शाखेतून यशवंत महाविद्यालय, नांदेड येथून पूर्ण केले. त्यांचे वडील दत्ता नारायण सूर्यतळे हे BSNL मध्ये नांदेड येथे वरिष्ठ दूरसंचार सहायक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या आईने त्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी प्रेरणा दिली. त्यांच्या आजी त्याच्याकरिता नेहमीच प्रेरणास्थान राहिल्या आहेत. डॉ. शीला यांनी लग्न होऊनही शिक्षणाची कास सोडली नाही. लग्नानंतरही त्यांचे सहचारी उपकार नरवाडे यांच्या सहकार्याने त्यांनी तीन विषयात M. A, M. Phil., Ph. D. पदवी पर्यन्तचे शिक्षण पूर्ण केले. सध्या त्या चिंतामणी महाव्दिद्यालय, पोंभूर्णा जि. चंद्रपूर येथे मागील १७ वर्षापासून विभाग प्रमुख (इंग्रजी), सहयोगी प्राध्यापाक म्हणून कार्यरत आहेत.

सप्टें. २०२२ मध्ये गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या झालेल्या निवडणुकीमध्ये अपक्ष, महिला प्रवर्ग, प्राध्यापक प्रतिनिधह म्हणून त्यांची बहुमताने निवड झाली. तेव्हापासून त्यांनी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली.

# लोहा येथे १० ऑक्टोबरला तिसरे जिल्हा मराठी साहित्य संमेलन

**लोहा (प्रतिनिधी)–** मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड आणि डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोहा यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे जिल्हा मराठी साहित्य संमेलन शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी लोहा येथे स्व. माजी खासदार भाई डॉ. केशवराव धोंडगे साहित्य नगरी डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी सायाळ रोड लोहा येथे पार पडणार आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. वि. ना. कदम राहणार असून, उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. अजय क्षीरसागर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मसाप शाखा नांदेडचे अध्यक्ष बालाजी इबितदार, कार्यवाह प्रा. महेश मोरे, सहकार्यवाह राम तरटे, संस्थेचे अध्यक्ष दिगंबर क्षीरसागर आदींची उपस्थिती होती.

साहित्य संमेलनास विशेष निमंत्रित म्हणून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर आणि आ. आनंदराव पाटील बोंढारकर उपस्थित राहणार आहेत. प्रमुख उपस्थितीत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य, ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत.

सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, सायाळ रोड, लोहा चौक येथे नगराध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते ग्रंथपूजन करण्यात येणार आहे.

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठांचा सन्मान; अन्नदान व भेटवस्तूंचे वितरण



**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त पळसगाव येथील एक परिवार वृद्धाश्रमात ज्येष्ठांचा सन्मान, अन्नदान व भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले. कृषिभूषण भगवानभाई इंगोले यांनी ज्येष्ठांच्या सहवासात वाढदिवस साजरा करून आनंदाचा क्षण सेवाभावाने अर्थपूर्ण केला.

वृद्धांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि आशीर्वाद हीच वाढदिवसाची खरी भेट असल्याची भावना व्यक्त करत वाढदिवसाला केकऐवजी स्थानिक शेतकऱ्यांची हंगामी फळे वापरण्याचे आवाहन इंगोले यांनी केले. यामुळे शेतमालाला बाजारपेठ मिळण्यासोबत आरोग्यदायी जीवनशैलीलाही प्रोत्साहन मिळेल, असे ते म्हणाले. योगिक व नैसर्गिक शेतीत सकारात्मक चिंतन, ध्यानधारणा आणि निसर्गाशी सुसंवादाचे महत्त्वही त्यांनी सांगितले.

ब्रह्माकुमारी शिवलिंगभाई यांनी संस्थेच्या सामाजिक व आध्यात्मिक कार्याची माहिती दिली. गीता बहीण यांनी जीवनमूल्ये व ध्यानधारणेचे महत्त्व सांगितले, तर कविता बहीण यांनी योग व मेडिटेशन करून घेतले. योगप्रशिक्षक एकनाथराव पाटील यांनी योगाविषयी मार्गदर्शन केले. कृषीसखी आशाताई खराटे यांनी नैसर्गिक शेतीविषयी माहिती दिली. सत्यनारायण मंत्रीभाई, ब्रह्मकुमार दत्ताईभाई तिडके, प्रकाशभाई चिखलीकर यांनी सहकार्य केले.

वृक्षमित्र फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष मुगटकर यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावणे व त्यांची जोपासना करणे आवश्यक असल्याचे सांगितले. वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्याचे आवाहन करत त्यांनी वृद्धाश्रमाला पाच झाडे भेट दिली. यावेळी वृक्षमित्र विनय मंतुरी, सुधाकर चेरुकुला, विश्वनाथ धनकोट, गजानन कदम व ज्ञानेश्वर चेरुकुला यांनी सहभाग नोंदविला.

मातोश्री चॅरिटेबल ट्रस्ट, पांगरा बोखारे संचलित एक परिवार वृद्धाश्रम २ जानेवारी २०२३ पासून विनाअनुदानित तत्त्वावर गरजू ज्येष्ठांसाठी कार्यरत आहे. ज्येष्ठांना मायेचा आधार व आपलेपणाची जाणीव मिळावी, या भावनेतून सुरू असलेल्या सेवाकार्यास आर्थिक व वस्तुरूपी मदत करावी, असे आवाहन विश्वस्त नंदाताई व गुलाब बोखारे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव कदम यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अमोल जोगदंड, प्रभाकर इंगोले, केशव चिंनके व संजय खराटे यांनी परिश्रम घेतले.

# पीपल्स कॉलेजमध्ये कॉलेज डे उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** ‘आजचा विद्यार्थी, उद्याचा शिक्षक’ या संकल्पनेतून पीपल्स कॉलेजमध्ये गुरुवारी कॉलेज डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षक, उपप्राचार्य, सुपरवायझर तसेच प्राचार्यांच्या भूमिका साकारत एक दिवस महाविद्यालयाचे कामकाज अनुभवले. यावेळी शिवानी नळेगावे हिने प्राचार्याची भूमिका साकारत प्राचार्यांच्या खुर्चीवर विराजमान होत महाविद्यालयीन प्रशासनाची जबाबदारी अनुभवली. सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव तथा पीपल्स कॉलेज शालेय समितीचे अध्यक्ष ॲड. प्रदीप नागापूरकर, उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे, प्राचार्याची भूमिका साकारणारी शिवानी नळेगावे, उपप्राचार्याची भूमिका साकारणारी समृद्धी गायकवाड, सुपरवायझर कृष्णा जाधव आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. विशाल पतंगे यांनी शिक्षणाचे खरे स्वरूप विद्यार्थ्यांना समजून घेण्याचे आवाहन केले. चार पुस्तके आणि चार भिंती यापलीकडेही शिक्षणाचे व्यापक विश्व आहे, याची जाणीव आज शिक्षकांची भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांना झाली असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयात येणे, कट्ट्यावर किंवा बागेत बसणे म्हणजे शिक्षण नव्हे; काहीतरी शिकणे, ते आत्मसात करणे आणि आचरणात आणणे हेच खरे शिक्षण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

‘चांगला विद्यार्थी हाच पुढे चांगला शिक्षक होऊ शकतो,’ असे सांगत डॉ. पतंगे यांनी शिक्षकांचे बोलणे मन लावून ऐकल्यास शिकवण्याच्या विविध पद्धती समजतात, असे नमूद केले. शिक्षकांप्रमाणेच विद्यार्थ्यांमध्येही स्वयंशिस्त असणे आवश्यक आहे. आजच्या शिक्षण प्रक्रियेत मोबाईल हा मोठा अडथळा ठरत असून, त्याचा किती आणि कसा वापर करायचा, हे विद्यार्थ्यांनी ठरवले पाहिजे. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक वेळ ग्रंथालय आणि पुस्तकांच्या सहवासात घालवावा. मोबाईलच्या युगातही शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी ‘टॉवर’ आहेत. चांगला विद्यार्थी घडला तर तो उद्याचा चांगला शिक्षक आणि चांगला माणूस म्हणून समाजात घडू शकतो, असे त्यांनी सांगितले.

ॲड. प्रदीप नागापूरकर यांनी आपल्या शालेय जीवनातील शिक्षक दिनाच्या आठवणींना उजाळा दिला. आपण विद्यार्थी असताना शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात मुख्याध्यापकाची भूमिका साकारली होती. भाषणासाठी उभे राहिल्यानंतर हात-पाय थरथरत असल्याची आठवण त्यांनी सांगितली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारणे हा केवळ उपक्रम नसून उद्याच्या समाजाची घडण करण्याची प्रक्रिया आहे. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून आज शिक्षकाची भूमिका निभावताना शिक्षक होणे किती अवघड आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली असेल, असे ते म्हणाले.

# सौ. विमल तुप्तेवार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सोमेश कॉलनी, कलामंदिर मागील परिसरातील प्रतिष्ठित सौ. विमल रामकृष्ण तुप्तेवार (वय ८६ वर्षे) यांचे



दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती रामकृष्ण तुप्तेवार, प्रदीप व डॉ. प्रवीण अशी दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे.

सौ. विमल तुप्तेवार यांची अंत्ययात्रा दि. ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता लक्ष्मीनारायण रेसिडेंसी, सोमेश कॉलनी येथून निघणार आहे. त्यांच्या पार्थिवावर शांतीधाम गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. श्री स्वामी समर्थ व अन्नछत्राचे विश्वस्त तथा पंचपदी मंडळाचे सदस्य प्रदीप तुप्तेवार यांच्या त्या मातोश्री होत.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# लिफ्टऐवजी जिना चढा

## रोजच्या या छोट्या सवयीचे शरीराला मिळू शकतात अनेक फायदे

**आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत व्यायामासाठी स्वतंत्र वेळ काढणे प्रत्येकालाच शक्य होते असे नाही. अशा परिस्थितीत दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या सवयींमधून शारीरिक हालचाल वाढवणे हा एक व्यवहार्य पर्याय ठरू शकतो. लिफ्टऐवजी जिन्याचा वापर करणे ही त्यापैकीच एक सोपी सवय आहे. जिना चढताना शरीराला स्वतःचे वजन वर उचलावे लागते. त्यामुळे हृदयाचे ठोके आणि शरीराची ऑक्सिजनची गरज वाढते. त्याचबरोबर शरीरातील ऊर्जेचा वापरही वाढतो. नियमितपणे जिने चढण्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांचे आरोग्य, पायांच्या स्नायूंची ताकद आणि एकूण शारीरिक तंदुरुस्ती सुधारण्यास मदत होऊ शकते.**



व्यायामाचा फायदा सातत्याने केल्यावर अधिक मिळतो. जिना चढण्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यासाठी स्वतंत्र व्यायामाचे सत्र ठरवण्याची गरज नसते. कार्यालय, घर, रेल्वे किंवा मेट्रो स्थानक अथवा खरेदी केंद्र अशा ठिकाणी लिफ्टऐवजी काही मजल्यांसाठी जिन्याचा वापर केल्याने दैनंदिन शारीरिक हालचाल वाढू शकते. याला 'व्यायामाचे छोटे सत्र' असेही म्हणता येईल. म्हणजे दिवसभरात एकाच वेळी दीर्घकाळ व्यायाम करण्याऐवजी कमी कालावधीसाठी अनेक वेळा शारीरिक हालचाल करणे. काही संशोधनांमध्ये अशा छोट्या पण तुलनेने जोरदार जिने चढण्याच्या सत्रांमुळे हृदय व फुफ्फुसांची कार्यक्षमता सुधारू शकते, असे आढळून आले आहे. म्हणजेच व्यायामाचा फायदा मिळवण्यासाठी प्रत्येक वेळी सलग ३० ते ४५ मिनिटे व्यायाम करणेच आवश्यक आहे असे नाही. दिवसभरातील छोट्या-छोट्या शारीरिक हालचालीही एकूण सक्रियता वाढवण्यास हातभार लावू शकतात.

### हृदयाच्या आरोग्याला कसा फायदा होतो?

जिने चढताना शरीराला अधिक ऑक्सिजनची आवश्यकता भासते. त्यानुसार हृदय रक्ताभिसरणाचा वेग वाढवते आणि श्वासोच्छ्वासही जलद होतो. नियमितपणे अशा प्रकारची शारीरिक हालचाल केल्याने हृदय व फुफ्फुसांची कार्यक्षमता म्हणजेच हृदय-श्वसन तंदुरुस्ती सुधारण्यास मदत होऊ शकते. काही अभ्यासांमध्ये नियमित जिने चढण्याच्या सरावामुळे ऑक्सिजन वापरण्याची कमाल क्षमता सुधारल्याचे आढळले आहे. त्यामुळे दैनंदिन कामे करताना शरीराची सहनशक्ती वाढण्यास मदत होऊ शकते.

### खालच्या शरीराच्या स्नायूंना होतो व्यायाम

साधे चालणे आणि जिने चढणे यामध्ये महत्त्वाचा फरक आहे. जिना चढताना प्रत्येक पायरीवर शरीराचे वजन वर उचलावे लागते. त्यामुळे मांडीचे पुढील स्नायू, मांडीमागील स्नायू, नितंबांचे स्नायू आणि पोटरीचे स्नायू अधिक सक्रिय होतात. नियमित जिने चढल्यामुळे खालच्या शरीरातील स्नायूंची ताकद आणि सहनशक्ती वाढण्यास मदत होऊ शकते. दैनंदिन जीवनातील हालचालींसाठी आवश्यक असलेली कार्यात्मक तंदुरुस्ती सुधारण्यासही त्याचा उपयोग होऊ शकतो.

### वजन नियंत्रणासाठी किती उपयुक्त?

शरीराचे वजन कमी करण्यासाठी शरीरातून खर्च होणारी ऊर्जा आणि आहारातून मिळणारी ऊर्जा यांच्यातील संतुलन महत्त्वाचे असते. जिने चढताना चालण्याच्या तुलनेत शरीराला अधिक मेहनत घ्यावी लागते आणि त्यामुळे ऊर्जेचा खर्च वाढू शकतो. मात्र, केवळ जिने चढल्याने वजन कमी होईल, अशी हमी देता येत नाही. वजनावर आहार, दिवसभरातील एकूण शारीरिक हालचाल, झोप, आनुवंशिकता आणि जीवनशैलीतील इतर घटकांचाही परिणाम होतो. त्यामुळे वजन नियंत्रणासाठी जिने चढणे ही एक उपयुक्त सवय ठरू शकते; मात्र त्यासोबत संतुलित आहार आणि नियमित शारीरिक हालचालही आवश्यक आहे.

### किती जिने चढून सुरुवात करावी?

सर्वांना लागू होईल अशी एकच संख्या नाही. जर एखादी व्यक्ती सध्या फारशी सक्रिय नसेल, तर सुरुवातीला एक-दोन मजल्यांपर्यंत जिन्याचा वापर करून पाहता येईल. शरीराची प्रतिक्रिया लक्षात घेऊन हळूहळू त्यात वाढ करता येते. सुरुवातीलाच अनेक मजले वेगाने चढण्याचा प्रयत्न करण्याची गरज नाही. शरीराला सवय होणे महत्त्वाचे आहे. लिफ्टऐवजी जिन्याचा वापर करणे ही रोजच्या जीवनात शारीरिक हालचाल वाढवण्याची सोपी आणि व्यवहार्य सवय ठरू शकते. यासाठी स्वतंत्र वेळ किंवा विशेष साधनांची आवश्यकता नसते. मात्र, जिने चढणे हा वजन कमी करण्याचा एकमेव उपाय नाही. आपल्या क्षमतेनुसार आणि आरोग्याची स्थिती लक्षात घेऊन नियमित हालचालींचा भाग म्हणून जिन्याचा वापर केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.



### जिने चढताना कोणती काळजी घ्यावी?

- सुरुवात संथ गतीने करावी.
- दम लागल्यास मध्ये विश्रांती घ्यावी.
- वय अधिक असल्यास किंवा तोल जाण्याची शक्यता असल्यास कठड्याचा आधार घ्यावा.
- आरामदायी आणि योग्य आकाराचे बूट वापरावेत.
- अचानक वेग वाढवणे किंवा क्षमतेपेक्षा जास्त मजले चढणे टाळावे.
- चक्कर येणे, छातीत दुखणे, असामान्य धाप लागणे किंवा तीव्र वेदना जाणवल्यास व्यायाम त्वरित थांबवावा.
- आधीपासून हृदयविकार, सांधेदुखी किंवा अन्य आरोग्यविषयक समस्या असल्यास व्यायामाची तीव्रता वाढवण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# अति चिंता अन् ताणामुळे त्वचेवर उठू शकतात लाल चट्टे; दुर्लक्ष करू नका...

**काही व्यक्तींमध्ये मानसिक ताण आणि चिंता यांचा परिणाम त्वचेवरही दिसून येतो. ताणतणावामुळे त्वचेवर खाज, लालसरपणा किंवा लाल चट्टे उठू शकतात. काही वेळा यामुळे 'पित्ती' (अर्टिकेरिया) ही त्वचेची समस्या उद्भवू शकते किंवा आधीपासून असलेली पित्ती अधिक तीव्र होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, ताणतणावाच्या काळात शरीरातील 'हायपोथॅलेमिक-पिट्यूटरी-अॅड्रिनल' (एचपीए) प्रणाली आणि सहानुभूती मज्जासंस्था सक्रिय होते. त्यामुळे कॉर्टिसोल, अॅड्रेनालिन यांसारख्या ताणाशी संबंधित संप्रेरकांच्या पातळीत बदल होतात. या बदलांचा परिणाम त्वचेतील मज्जातंतू आणि रोगप्रतिकारक पेशींवर होऊ शकतो. परिणामी काही व्यक्तींमध्ये त्वचेच्या समस्या निर्माण होऊ शकतात किंवा वाढू शकतात.**



ताण आणि चिंता काही व्यक्तींमध्ये त्वचेवर पुरळ, खाज किंवा इतर लक्षणे निर्माण करू शकतात अथवा आधीपासून असलेली त्वचारोगाची समस्या वाढवू शकतात. मात्र, त्वचेवर दिसणाऱ्या प्रत्येक पुरळाचे कारण ताणतणावच आहे, असे मानणे योग्य नाही. मानसिक ताणाच्या काळात शरीरातील एचपीए प्रणाली आणि सहानुभूती मज्जासंस्था सक्रिय होते. यामुळे कॉर्टिसोल, अॅड्रेनालिन आणि इतर न्यूरोएंडोक्राइन घटकांच्या पातळीत बदल होतात. त्वचेतील मज्जातंतू आणि रोगप्रतिकारक पेशी या बदलांना प्रतिसाद देतात. त्यामुळे काही व्यक्तींमध्ये त्वचेची संवेदनशीलता वाढू शकते आणि खाज, लालसरपणा किंवा पुरळ यांसारखी लक्षणे दिसू शकतात.

### शरीरात कोणते हार्मोनल बदल होतात?

व्यक्ती एखाद्या तणावपूर्ण परिस्थितीचा सामना करते तेव्हा मेंदूमधील ताण-प्रतिक्रिया यंत्रणा सक्रिय होते. एचपीए प्रणालीच्या माध्यमातून 'सीआरएच' आणि त्यानंतर 'एसीटीएच' या संप्रेरकांचे स्रवण वाढते. यामुळे अधिवृक्क ग्रंथींमधून कॉर्टिसोलचे स्रवण होते. त्याच वेळी सहानुभूती मज्जासंस्था सक्रिय होऊन अॅड्रेनालिन आणि नॉरअॅड्रेनालिन यांसारख्या घटकांच्या माध्यमातून शरीराला 'लढा किंवा पळा' या प्रतिक्रियेसाठी तयार करते. कॉर्टिसोल शरीराच्या ताण-प्रतिक्रियेचे नियमन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. मात्र, मानसिक ताणाचा परिणाम केवळ संप्रेरकांपुरता मर्यादित राहत नाही. त्वचेमध्ये असलेल्या रोगप्रतिकारक पेशी आणि मज्जातंतूंच्या टोकांवरही ताणाशी संबंधित संकेतांचा परिणाम होऊ शकतो.

### चिंता आणि पित्ती यांचा काय संबंध आहे?

'पित्ती' (अर्टिकेरिया किंवा हाइव्ह्ज) ही त्वचेवर अचानक उठणाऱ्या, खाज सुटणाऱ्या आणि उंचवट्यासारख्या दिसणाऱ्या चट्ट्यांची अवस्था आहे. हे उंचवटे शरीराच्या कोणत्याही भागावर दिसू शकतात आणि त्यांचा आकारही वेगवेगळा असू शकतो. पित्ती निर्माण होण्यात 'मास्ट पेशी' महत्त्वाची भूमिका बजावतात. या पेशी सक्रिय झाल्यानंतर हिस्टामिनसह विविध दाह निर्माण करणारे घटक बाहेर पडतात. त्यामुळे त्वचेतील रक्तवाहिन्या आणि मज्जातंतूंवर परिणाम होऊन लालसर, खाज सुटणारे आणि उंचवट्यासारखे चट्टे निर्माण होऊ शकतात. ताणतणाव आणि दीर्घकाळ राहणारी पित्ती यांच्यातील संबंधावर संशोधन सुरू असून, मज्जासंस्था आणि रोगप्रतिकारक यंत्रणा यांच्यातील परस्परसंवादाला यामध्ये महत्त्व दिले जाते.

### ताणामुळे त्वचेची खाज का वाढते?

मानसिक ताण आणि चिंता यांचा खाज वाढण्याशी संबंध असल्याचे आढळून आले आहे. ताणामुळे आधीपासून असलेली खाज अधिक तीव्र होऊ शकते. परिणामी खाज वाढते, त्यामुळे व्यक्ती अधिक अस्वस्थ आणि चिंताग्रस्त होते आणि त्यातून पुन्हा खाज वाढण्याचे दुष्टचक्र तयार होऊ शकते. दीर्घकाळ खाजेच्या समस्येने त्रस्त असलेल्या अनेक व्यक्तींना मानसिक ताणाच्या काळात लक्षणे अधिक तीव्र झाल्याचा अनुभव येतो.

### लक्षणे : पित्ती कशी दिसते?

- त्वचेवर लालसर किंवा त्वचेच्या रंगाचे उंचवटे किंवा चट्टे दिसणे.
- चट्ट्यांमध्ये तीव्र खाज सुटणे.
- वेगवेगळ्या आकाराचे गोल किंवा अनियमित उंचवटे निर्माण होणे.
- एका ठिकाणचे चट्टे कमी होऊन दुसऱ्या ठिकाणी नवीन चट्टे दिसणे.
- उष्णता, घाम किंवा मानसिक ताण वाढल्यावर लक्षणे अधिक तीव्र होणे.

### तर दुर्लक्ष करू नका!

मानसिक ताण किंवा चिंतेच्या काळात अचानक खाज सुटणारे, उंचवटे असलेले लाल चट्टे दिसू लागले आणि ते काही वेळाने कमी होऊन पुन्हा दुसऱ्या ठिकाणी दिसू लागले, तर पित्ती हे त्यामागील एक संभाव्य कारण असू शकते. मात्र, त्वचेवरील पुरळ केवळ ताणामुळेच आहे, असे स्वतःहून ठरवणे योग्य नाही. पुरळ कधी सुरू झाला, किती वेळ राहतो, कोणती औषधे घेतली आहेत, आहारात काही बदल झाला आहे का, संसर्गाची शक्यता आहे का आणि इतर कोणते घटक कारणीभूत ठरू शकतात, याचा विचार करणे आवश्यक आहे. त्वचेवरील चट्टे वारंवार येत असतील, बराच काळ टिकत असतील किंवा लक्षणे तीव्र असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. प्रत्येक त्वचारोगाला 'ताणामुळे झालेले पुरळ' समजणे धोकादायक ठरू शकते. अशा वेळी त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेऊन योग्य तपासणी आणि उपचार करून घेणे आवश्यक आहे.



# हृदय केवळ स्नायू नव्हे, तर एक विद्युत अवयवही!

**हृदय दर मिनिटाला सातत्याने धडधडत असते. मात्र, प्रत्येक वेळी हृदय आकुंचन पावण्याचा आणि त्यानंतर सैल होण्याचा संकेत नेमका कुठून मिळतो, याचा आपण कधी विचार केला आहे का? हृदयाला केवळ एक स्नायू समजणे म्हणजे त्याची संपूर्ण कार्यपद्धती समजून घेणे नव्हे. हृदयाच्या प्रत्येक ठोक्यामागे अत्यंत शिस्तबद्ध विद्युत यंत्रणा कार्यरत असते. हृदयाच्या कोणत्या भागाने, कोणत्या क्रमाने आकुंचन पावावे, हे हीच यंत्रणा ठरवते.**

हृदयाच्या या विद्युत यंत्रणेत काही विशेष पेशी स्वतःहून विद्युत आवेग निर्माण करू शकतात. हे आवेग सर्वप्रथम हृदयाच्या वरच्या कप्प्यांना म्हणजेच अलिंदांना सक्रिय करतात. त्यानंतर नियंत्रित मार्गाने हे विद्युत संकेत खालच्या कप्प्यांपर्यंत म्हणजे निलयांपर्यंत पोहोचतात. या संपूर्ण प्रक्रियेमुळे हृदयाचे विविध कप्पे समन्वयाने आकुंचन पावतात आणि रक्त फुफ्फुसांकडे तसेच संपूर्ण शरीराकडे पंप केले जाते. हृदयाचे प्रमुख कार्य रक्त पंप करणे हे आहे. त्यासाठी हृदयाच्या स्नायूंचे म्हणजेच मायोकार्डियमचे वारंवार आकुंचन आणि शिथिलीकरण होणे आवश्यक असते. मात्र, हृदयातील स्नायूंच्या पेशी प्रत्येक वेळी स्वतःहून एकाच वेळी आकुंचन पावू शकत नाहीत. त्यांना विद्युत सक्रियतेची आवश्यकता असते. यासाठी हृदयामध्ये विशिष्ट पेशी आणि ऊतींची एक स्वतंत्र विद्युत वहन यंत्रणा असते. तिला 'हृदयाची विद्युत वहन प्रणाली' किंवा 'कार्डिॲक कंडक्शन सिस्टिम' म्हणतात. ही प्रणाली विद्युत आवेग निर्माण करते आणि ते हृदयाच्या विविध भागांपर्यंत पोहोचवते. त्यामुळे हृदयाचे कप्पे एका निश्चित आणि समन्वयित क्रमाने सक्रिय होतात.



### हृदयाच्या ठोक्याचा विद्युत संकेत सर्वप्रथम कुठे तयार होतो?

सामान्य हृदयलयीत पहिला विद्युत आवेग प्रामुख्याने 'सिनोॲट्रियल नोड' म्हणजेच 'एसए नोड' येथे निर्माण होतो. हा भाग उजव्या अलिंदाच्या वरच्या भिंतीमध्ये, वरच्या महाशिरेच्या प्रवेशाजवळ असतो. एसए नोडमधील विशेष 'पेसमेकर' पेशींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांना बाहेरून विद्युत संकेत मिळण्याची आवश्यकता नसते. त्या स्वतःहून नियमितपणे विद्युत आवेग निर्माण करू शकतात. याच स्वयंचलित विद्युत क्रियेमुळे हृदयाच्या ठोक्याची सुरुवात होते. एसए नोडमधून विद्युत आवेग निर्माण झाल्यानंतर तो अलिंदांच्या स्नायूंमध्ये पसरतो. त्यामुळे उजवा आणि डावा अलिंद आकुंचन पावतात आणि त्यातील रक्त निलयांकडे ढकलले जाते.

### एसए नोडला हृदयाचा नैसर्गिक पेसमेकर का म्हणतात?

सामान्य परिस्थितीत हृदयाची विद्युत लय ठरविणारा प्रमुख पेसमेकर म्हणजे एसए नोड. त्यामुळे त्याला हृदयाचा 'नैसर्गिक पेसमेकर' म्हटले जाते. हृदयाच्या इतर काही भागांतील पेशीही स्वतःहून विद्युत आवेग निर्माण करू शकतात. मात्र, सामान्य परिस्थितीत एसए नोडमधील पेशींचा स्वाभाविक विद्युत वेग अधिक असल्याने हृदयाच्या लयीवर त्यांचे नियंत्रण राहते. प्रौढ व्यक्तीमध्ये विश्रांतीच्या अवस्थेतील सामान्य हृदयगती साधारणपणे ६० ते १०० ठोके प्रति मिनिट असते. मात्र, वय, शारीरिक तंदुरुस्ती, व्यायाम, शरीराचे तापमान आणि भावनिक स्थिती यांसारख्या अनेक घटकांनुसार हृदयगती बदलू शकते. व्यायाम किंवा ताणतणावाच्या काळात मज्जासंस्थेच्या प्रभावामुळे हृदयगती वाढते, तर विश्रांतीच्या वेळी ती कमी होऊ शकते. त्यामुळे एसए नोड एखाद्या ठरावीक वेळेनुसार चालणाऱ्या यंत्रासारखे काम करत नाही. शरीराच्या गरजेनुसार मज्जासंस्था त्याच्या विद्युत आवेगांच्या गतीवर परिणाम करते.



### विद्युत संकेत अलिंदांपर्यंत कसा पोहोचतो?

एसए नोडमधून निर्माण झालेला विद्युत आवेग प्रथम उजव्या अलिंदाभोवतीच्या हृदयाच्या स्नायूंच्या पेशींमध्ये पसरतो आणि त्यानंतर संपूर्ण अलिंदांच्या स्नायूंमध्ये पोहोचतो. विद्युत संकेत पोहोचताच अलिंदांच्या स्नायूंच्या पेशींमध्ये विद्युत बदल घडून येतो आणि त्या आकुंचन पावतात. त्यामुळे अलिंदांमध्ये साठलेले रक्त खालील निलयांकडे जाते. यानंतर विद्युत आवेग 'एट्रिओव्हेंट्रिक्युलर नोड' म्हणजेच 'एव्ही नोड'कडे पोहोचतो. येथे विद्युत संकेताच्या वहनाला अल्प विलंब होतो. हा विलंब अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे अलिंदांना त्यांचे आकुंचन पूर्ण करून निलयांमध्ये रक्त भरून देण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. त्यानंतर विद्युत संकेत पुढे निलयांकडे पोहोचतो आणि निलयांचे आकुंचन सुरू होते. परिणामी उजवा निलय रक्त फुफ्फुसांकडे, तर डावा निलय ऑक्सिजनयुक्त रक्त संपूर्ण शरीराकडे पंप करतो. हृदयाच्या प्रत्येक ठोक्यामागे अशी अत्यंत अचूक आणि समन्वयित विद्युत प्रक्रिया सुरू असते. सामान्य हृदयलयीत या प्रक्रियेची सुरुवात एसए नोडपासून होते. त्यामुळेच त्याला हृदयाचा नैसर्गिक पेसमेकर म्हटले जाते. हृदयाच्या एका ठोक्यापासून दुसऱ्या ठोक्यापर्यंत चालणारी ही विद्युत प्रक्रिया काही क्षणांत पूर्ण होते; मात्र याच प्रक्रियेची सातत्याने पुनरावृत्ती होत राहिल्यामुळे हृदय दिवस-रात्र अविरतपणे रक्ताभिसरणाचे काम करत राहते.

# मुंबई येथे महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील ओबीसी कार्यकर्त्यांचा प्रशिक्षण मेळावा; 'मंडल विरुद्ध मनुवाद' पुस्तकाचे प्रकाशन



**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या वतीने काँग्रेस मुख्यालय टिळक भवन, मुंबई येथे महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांतून आलेल्या ओबीसी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ओबीसी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. मोठ्या उत्साहात आणि उत्स्फुर्त वातावरणात पार पडलेल्या या शिबिरात सामाजिक न्याय, संविधानिक अधिकार, आरक्षण, जातीनिहाय जनगणना आणि ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वाच्या प्रश्नांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

याच कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. यशपाल भिंगे लिखित 'मंडल विरुद्ध मनुवाद' या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद आणि प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, आयसीसी सचिव सौ. रेहाना चिश्ती, खासदार श्रीमती प्रतिभा धानोरकर, काँग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार, तसेच काँग्रेसचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि राज्यभरातून आलेले ओबीसी विभागाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद यांनी जातिव्यवस्थेवर टीका करताना सांगितले की, जातिव्यवस्थेने समाजामध्ये विविध घटकांमध्ये भेदभाव आणि संघर्ष निर्माण केला. या उतरंडीच्या व्यवस्थेमध्ये ओबीसी समाजाला जाणीवपूर्वक दुय्यम स्थान देण्यात आले असून, मनुस्मृतीवर आधारित विचारसरणीने ओबीसी समाजाचे शोषण केले.

प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्रातील आरक्षणाच्या प्रश्नावर भाष्य करताना सांगितले की, विविध समाजघटक आज आरक्षणासाठी आंदोलन करीत आहेत. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा वाढविणे आणि जातीनिहाय जनगणना करणे हाच आरक्षणाच्या प्रश्नावरील खरा मार्ग आहे.

भाजप सरकार मात्र हे निर्णय घेण्यास तयार नाही. विविध समाज आरक्षणासाठी संघर्ष करीत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठा आणि ओबीसी समाजामध्ये संघर्ष निर्माण करण्याचे काम करीत आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारने मराठा समाजाला दिलेले आरक्षण कायम ठेवले असते, तर आजची परिस्थिती निर्माण झाली नसती, असे सपकाळ यांनी म्हटले.

काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. राहुल गांधी यांनी ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठविला. त्यांच्या पाठपुराव्यामुळे जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर निर्णायक बनला, असे वडेट्टीवार म्हणाले.

कार्यक्रमात 'मंडल विरुद्ध मनुवाद' या पुस्तकाचे लेखक आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. यशपाल भिंगे यांनी मंडल आयोगाचे अध्यक्ष बी. पी. मंडल यांच्या ऐतिहासिक योगदानाचा उल्लेख केला. ओबीसी समाजाला स्वतंत्र सामाजिक व राजकीय ओळख देण्यामध्ये बी. पी. मंडल यांचे योगदान ऐतिहासिक आहे. त्यांनी देशभरातील सामाजिक वास्तवाचा अभ्यास करून व्यापक माहिती व आकडेवारीच्या आधारे ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षणाची शिफारस केली, असे डॉ. भिंगे यांनी सांगितले.

या प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधून सहभागी झालेल्या ओबीसी कार्यकर्त्यांना संघटनात्मक बांधणी, राजकीय व सामाजिक जागृती, संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय, आरक्षण, जातीनिहाय जनगणना आणि लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. ओबीसी समाजाने केवळ मतदार म्हणून न राहता राजकीय नेतृत्व करणारा समाज बनले पाहिजे आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याला अधिक व्यापक व संघटित स्वरूप दिले पाहिजे, असा निर्धार या भव्य प्रशिक्षण शिबिरातून करण्यात आला.

## पोलिसांच्या साहसी कामगिरीसाठी 'मुख्यमंत्री शौर्य पदक'; मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)**–कर्तव्य बजावताना जीवाची पर्वा न करता साहसी कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या शौर्याची दखल घेण्यासाठी राज्य सरकारकडून 'मुख्यमंत्री शौर्य पदक' सुरू करण्यात येणार आहे. या पदकासोबत ५० हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार असून, दरवर्षी महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला या पदकांची घोषणा केली जाणार आहे. मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली.

माओवाद, दहशतवाद, जातीय दंगली, संघटित गुन्हेगारी आणि तस्करीसह अंतर्गत सुरक्षा तसेच बाह्य हल्ल्यांच्या प्रसंगी महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचारी जोखीम पत्करून कर्तव्य बजावतात. गडचिरोली आणि गोंदिया हे माओवादप्रभावित जिल्हे असून, अशा भागांत तसेच राज्यातील इतर ठिकाणी धाडसी कामगिरी करणाऱ्या पोलिसांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हे पदक देण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडून पोलीस दलातील शौर्याची दखल घेऊन विविध पदके दिली जातात. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात राज्यस्तरीय शौर्य पदक सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पदकांची संख्या दरवर्षी निश्चित राहणार नाही. क्षेत्रीय पातळीवरून प्राप्त होणारे कामगिरीचे अहवाल आणि आलेल्या प्रस्तावांच्या आधारे पदकांची संख्या निश्चित केली जाईल. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली प्रथम निवड समिती प्रस्तावांची छाननी करेल. जिल्हास्तरावरून पोलीस अधीक्षक संबंधित विशेष पोलीस महानिरीक्षकांमार्फत, तर पोलीस आयुक्त थेट पोलीस महासंचालकांकडे प्रस्ताव सादर करतील. त्यानंतर गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शासनस्तरीय समितीकडून प्रस्तावांची छाननी होऊन ते गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केले जातील. विशेष म्हणजे, शौर्य पदक मरणोत्तर देण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

## भारतीय नौदलाच्या ताफ्यात पहिलं स्वदेशी 'सूर्या' जहाज दाखल; संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते जलावतरण

**विशाखापट्टणम(वृत्तसंस्था)**–भारतीय नौदलाची समुद्रातील क्षमता आणि ताकद अधिक मजबूत करण्यासाठी भारताने एक मोठे पाऊल उचलले आहे. मंगळवारी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी विशाखापट्टणम येथील 'हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेड' येथे भारताच्या पहिल्या स्वदेशी 'फ्लीट सपोर्ट शिप' म्हणजेच 'सूर्या' या जहाजाचे जलावतरण केले. भारतीय नौदलाची ताकद वाढवण्यासाठी १९,००० कोटी रुपये खर्चून अशी एकूण पाच विशेष पुरवठा जहाजे बांधली जात आहेत. त्या मालिकेतील 'सूर्या' हे पहिलेच जहाज आहे.



कोणत्याही नव्या जहाजाच्या किंवा युद्धनौकेच्या बांधणीत 'जलावतरण' हा अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक टप्पा मानला जातो. याचा सोपा अर्थ म्हणजे, कोरड्या गोदीत तयार केलेले ते जहाज पहिल्यांदाच अधिकृतपणे समुद्राच्या पाण्यात उतरवले जाते. या विशेष सोहळ्याला भारतीय नौदल प्रमुख डमिरल कृष्णा स्वामीनाथन यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात बोलताना संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले, भारताला आपल्या सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी आणि क्षेत्रात वर्चस्व टिकवण्यासाठी एका शक्तिशाली नौदलाची गरज आहे. केवळ 'आत्मनिर्भर' होणे हेच आपले उद्दिष्ट नसून, भारताला जगातील अव्वल दर्जाची सागरी महासत्ता बनवणे हे आपले मुख्य ध्येय आहे.

**पान १ वरून...**

**सिमेंट काँक्रिटच्या नवीन...**

करणे अनिवार्य आहे. यासाठी आगामी १६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणी वापरामध्ये किमान १० टक्के कपात करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी पुढील ७ दिवसांत पाणी बचतीचे सविस्तर नियोजन सादर करावे असे निर्देश यावेळी मनपा आयुक्तांनी दिले आहेत. त्याचप्रमाणे बांधकाम क्षेत्रातील पाण्याचा मोठा वापर पाहता, शहरातील सुरू असलेली सिमेंट काँक्रिटची विकास कामे पुढील १० दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानंतर शहरातील कोणत्याही नवीन सिमेंट काँक्रिटच्या कामांना परवानगी देण्यात येणार नाही. पाण्याचा एकही थेंब वाया जाऊ नये यासाठी पुढील ८ दिवसांत संपूर्ण शहरातील पाणी पुरवठा गळती दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत असे कडक निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

मुख्य जलवाहिन्या तसेच अंतर्गत जलवाहिन्यांवरील गळती तातडीने थांबवून त्याचा अहवाल सादर करावा तसेच जलाशयावरील पंपिंग पूर्ण क्षमतेने व योग्य रितीने चालवणे तसेच जलशुद्धीकरण केंद्रावरील पाणी आवर्तनावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पाणी वापराचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला असून पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. भविष्यातील गंभीर टंचाईचा सामना करण्यासाठी एकूण उपलब्ध जलसाठ्यापैकी किमान १० टक्के अतिरिक्त पाणी साठा बफर/आपत्कालीन साठा म्हणून राखून ठेवण्यात येईल. परिस्थिती आणखी बिकट झाल्यास आवश्यकता लक्षात घेऊन धरणातील मृतसाठ्यातील पाण्याचा वापर कसा करता येईल, याचे तांत्रिक नियोजन आत्तापासूनच करण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच पाणी टंचाईच्या अनुषंगाने भविष्यात शहरात जी कामे हाती घ्यावयाची आहेत, त्यांचाही आराखडा आत्तापासूनच विचारात घ्यावा, असे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले.

या बैठकीला शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, क्रिडा व सांस्कृतिक अधिकारी रमेश चवरे, उपअभियंता प्रकाश कांबळे, खुशाल कदम, नरेंद्र सुजलेगांवकर, शिवकन्या जायेभाये, कनिष्ठ अभियंता शेख जैनौद्दीन, उत्तम स्वामी, राजकुमार बोडके, जक्कीउल्ला खाँन, किरण सुर्यवंशी, व्यंकटेश गोकुळे, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे आदी उपस्थित होते.

-------------

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर....**

परिस्थितीवर मात करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहेत. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि इतर साधनसामग्रीचा योग्य नियोजनातून वापर करून 'जलतारा'अंतर्गत अधिकाधिक कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करून ते अडविणे व जमिनीत मुरविणे, भूजल पातळी वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करणे, यासाठी जलसंधारणाच्या कामांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. गावपातळीवर आवश्यकतेनुसार कामांचे नियोजन करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.

वरिष्ठ प्रशासनाने थेट गावपातळीवर भेट देऊन जलसंधारणाच्या कामांचा आढावा घेतल्याने माहूर तालुक्यातील 'जलतारा' उपक्रमाला गती मिळणार आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी उपलब्ध पाणीसाठ्याचे संवर्धन आणि पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संधारण करण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

----------

**दुश्काळग्रस्त तालुक्यांतील...**

आवश्यक आहे. तसेच संबंधित विद्यार्थ्याने इतर कोणत्याही शासकीय शैक्षणिक सवलतीतून परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती घेतलेली नसल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची महाविद्यालयीन स्तरावर छाननी व पडताळणी करण्यात येणार असून, पात्र विद्यार्थ्यांनाच परीक्षा शुल्क माफीची सवलत मिळणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी विहित हमीपत्रही सादर करणे आवश्यक आहे. दरम्यान, हिवाळी-२०२६ परीक्षेचे परीक्षा अर्ज सादर करण्यासाठी विद्यापीठाने मुदतवाढ दिली असून, संबंधित परीक्षा अर्ज १० ऑक्टोबर २०२६ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. त्यानंतर महाविद्यालयनिहाय सुधारित वेळापत्रकानुसार परीक्षा अर्ज व ऑनलाइन शुल्कासंबंधीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.


## PUBLIC NOTICE

I, ABDUL SAJEED ABDUL SHAKEEL, son of SHAKEEL ABDUL, residing at H. No. 76, Near Rafai Masjid, Rafai Colony, Deglur, P.O. Degloor, Dist. Nanded, Maharashtra – 431717, hereby declare that my father's name is recorded as "SHAKEEL ABDUL" in some of his documents and records, whereas it is recorded as "MD SHAKEEL" in certain other documents and records.

I hereby declare that "SHAKEEL ABDUL" and "MD SHAKEEL" are one and the same person and both names refer to my father only. There is no difference in his identity. This public notice is being published for information and record purposes and to clarify the discrepancy in my father's name appearing in different documents/records.

Address :- H. No. 76, Near Rafai Masjid, Rafai Colony, Deglur, P.O. Degloor, Dist. Nanded, Maharashtra – 431717

## PUBLIC NOTICE

I, residing H. No. 76, Near Rafai Masjid, Rafai Colony, Deglur, P.O. Degloor, Dist. Nanded, Maharashtra – 431717, hereby declare that my name is recorded as "SHAKEEL ABDUL" in some of my documents and records, whereas it is recorded as "MD SHAKEEL" in certain other documents and records. I hereby declare that "SHAKEEL ABDUL" and "MD SHAKEEL" are one and the same person and both names refer to me only. There is no difference in my identity. This public notice is being published for information and record purposes and to clarify the discrepancy in my name appearing in different documents/records.

Address :- H. No. 76, Near Rafai Masjid, Rafai Colony, Deglur, P.O. Degloor, Dist. Nanded, Maharashtra – 431717

## टी. सी. हरवली

माझी केंद्रे वैभव संजय या नावाची बी. टेक. इंजिनिअरींग पासची मूळ टी. सी. व इतर कागदपत्रं वजिराबाद ते भावसार चौक दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कुणाला आढळल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता- केंद्रे वैभव संजय रा. श्री रेणुकाई निवास, पवननगर भावसार चौक, तरोडा खु. नांदेड

## टी. सी. हरवली

माझी हिलालपुरे दिलीप काशिनाथराव या नावाची इयत्ता १० वी पासची टी.सी. वाघी ते नांदेड दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कुणाला आढळल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता- दिलीप काशिनाथराव हिलालपुरे मु. पो. वाघी, ता. जि. नांदेड मो. ७६२०२६७६४८


## विधान परिषदेच्या पाच जागांसाठी बहुरंगी लढती; पुणे, नागपूर, अमरावतीत बंडखोरी थोपवण्याचे आव्हान

**मुंबई(प्रतिनिधी)** – महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातील पाच जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर निवडणुकीचे प्राथमिक चित्र स्पष्ट झाले आहे. पुणे शिक्षक, पुणे पदवीधर, नागपूर पदवीधर, अमरावती शिक्षक आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर या पाचही मतदारसंघांत प्रमुख पक्षांच्या उमेदवारांसोबतच बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने लढती बहुरंगी झाल्या आहेत. ९ ऑक्टोबरला अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे आणि काँग्रेसचे जयंत आसगावकर यांच्यासोबत शिवसेनेचे मंगेश चिवटे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर, मंत्री उदय सामंत यांचे निकटवर्तीय सचिन सानप यांनीही अपक्ष अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रमुख पक्षांच्या उमेदवारांसोबत अतिरिक्त उमेदवारांमुळे मतविभाजनाचे समीकरण निर्माण झाले आहे. दुसरीकडे पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपच्या डॉ. स्मिता जाधव यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव मैदानात आहेत. माजी आमदार दत्ता सावंत यांनीही अपक्ष अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे महायुतीसमोर बंडखोरीचे आव्हान उभे राहिले आहे.

नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे सुधाकर कोहळे आणि काँग्रेसचे अभिजीत वंजारी यांच्यात प्रमुख लढत आहे. भाजपचे माजी आमदार अनिल सोले यांनी अपक्ष अर्ज दाखल केल्याने भाजपसमोर बंडखोरी थोपवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नितेश कराळे आणि संजय थुल यांनीही अपक्ष अर्ज दाखल केले आहेत.

अमरावती शिक्षक मतदारसंघात काँग्रेसच्या अदिती पोहरे, उबाठा गटाचे दत्तात्रय लहाने आणि शिवसेनेचे किरण सरनाईक हे प्रमुख उमेदवार आहेत. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे दिलीप कडू आणि शिवसेनेचे माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांनीही अर्ज दाखल केले आहेत. युवा स्वाभिमान संघटनेच्या प्रीती रेवणे यांच्यासह अन्य उमेदवारही रिंगणात आहेत. भाजपशी संबंधित शेखर भोयर, सुमित पवार, पोहरादेवीचे महंत सुनील महाराज आणि भाजप खासदार अनिल बोंडे यांच्या भगिनी संगीता शिंदे यांनीही अर्ज दाखल केले आहेत.

त्यामुळे या मतदारसंघात अनेक दावेदारांमुळे लढत बहुकोनी झाली आहे.

## ऐन सणासुदीत विमान प्रवास महागणार; इंडिगोने इंधन शुल्कात केली वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)** – सणासुदीच्या काळात विमानाने प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या खर्चात आता वाढ होण्याची शक्यता आहे. देशातील मोठ्या विमान कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडिगोने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांच्या तिकिटांवरील इंधन शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन दर ६ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्रीपासून होणाऱ्या नवीन बुकिंगसाठी लागू होणार आहेत.

गेल्या काही दिवसांत आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. मध्य पूर्वेतील तणावामुळे इंधनाच्या दरावर परिणाम झाला असून विमानांसाठी वापरल्या जाणाऱ्या एटीएफच्या किमतीतही वाढ झाली आहे. वाढलेल्या इंधन खर्चाचा परिणाम विमान कंपन्यांच्या खर्चावर होत असल्याने इंडिगोने इंधन शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

देशांतर्गत उड्डाणांसाठी अंतरानुसार इंधन शुल्क आकारले जाणार आहे. ५०० किमीपर्यंतच्या प्रवासासाठी ३७५ रुपये, १,००० किमीपर्यंत ६०० रुपये, १,००१ ते १,५०० किमीपर्यंत ९०० रुपये, २,००० किमीपर्यंत १,१५० रुपये आणि २,००० किमीपेक्षा जास्त अंतरासाठी १,३०० रुपये शुल्क असेल. आंतरराष्ट्रीय मार्गांवर डठउ देशांसाठी ५०० किमीपर्यंत १,००० रुपये आणि त्यापेक्षा जास्त अंतरासाठी ३,००० रुपये शुल्क आकारले जाईल. तर आग्नेय आशिया, आखाती देश, मध्य पूर्व, उत्तर व पूर्व आशियासाठी ५,५०० रुपये, आफ्रिकेसाठी ६,००० रुपये आणि युरोपसाठी १०,००० रुपये इंधन शुल्क निश्चित करण्यात आले आहे.


## जाहीर निविदा सूचना

गणेश को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर, नांदेड
नोंदणी क्र. एनएनडी/एचएसजी/२०६ ऑफ ७८ दिनांक २०/१/१९७८

संस्थेच्या कार्यालयीन कामकाजाच्या आधुनिकीकरणासाठी खालील नमूद केलेल्या साहित्याचा पुरवठा करणे आणि तांत्रिक कामासाठी अनुभवी नोंदणीकृत व पात्र पुरवठाधारक/एजन्सीजकडून शिलबंद निविदा (टेंडर) मागविण्यात येत आहेत.

कामाचा/साहित्याचा तपशील

१. कॉम्प्युटर २. प्रिंटर आणि स्कॅनर पुरवठा करणे, ३. संस्था दस्ताऐवज संगणकीकरण(संस्थेचे जुने व चालू दस्ताऐजव स्कॅन करून डिजीटल स्वरूपात जतन करणे), ४. संस्था व्यवस्थापन प्रणाली संस्थेचा हिशोब आणि व्यवस्थापनासाठी योग्य सॉफ्टवेअर प्रणाली विकसित स्थापित करणे.

**अटी व शर्ती–**

१. शिलबंद निविदा विहित नमुन्यात भरून दिनांक ९/१०/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सकाळी ९ ते ११ पर्यंत स्वीकारल्या जातील. २. निविदेसोबत आवश्यक ती नोंदणी प्रमाणपत्र (जीएसटी, पॅन नंबर इत्यादी) तत्सम काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. ३. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संस्थेच्या संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

सचिव अध्यक्ष
गणेश को.ऑप. हाऊसिंग सोसायटी, लि. नांदेड


## शरद पवारांचा उमेदवार मैदानात, ठाकरेंची चिंता वाढली, मराठवाडा पदवीधर मतदारसंघात मविआत बंडखोरी

**मुंबई (प्रतिनिधी)**– पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलच तापलं आहे. सर्वच राजकीय पक्षांनी ताकद पणाला लावली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्येही बंडखोरी झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीसमोर बंडखोरीचे मोठं आव्हान उभे राहिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राजेश टोपे देखील उपस्थित होते.

महाविकास आघाडीकडून कालच शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार दिलीप घुगे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यामुळे आता महाविकास आघाडीतही उमेदवारीवरून चुरस निर्माण झाली आहे. दरम्यान, दिलीप घुगे आपला उमेदवारी अर्ज मागे घेतील, असा विश्वास प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. तर ठाकरे गटाशी चर्चा सुरू असून निश्चितच त्यांचा उमेदवार अर्ज मागे घेईल, अशी प्रतिक्रिया राजेश टोपे यांनी दिली आहे. त्यामुळे आता महाविकास आघाडीतील उमेदवारीचा अंतिम निर्णय काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठवाडा पदवीधर निवडणुकीमध्ये महायुतीची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या पारड्यात पडल्याची चर्चा होती. माजी आमदार सतीश चव्हाण यांनी महायुतीकडून उमेदवारीचा अर्ज दाखल केला होता. मात्र आता, महायुतीत भाजपचा एम. के. देशमुख यांनी बंडखोरी करत उद्या अर्ज भरणार असल्याची घोषणा केलीय. त्यामुळे महायुतीतच बंडखोरी झाल्याची चर्चा रंगली आहे. दुसरीकडे, मराठवाडा पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार दिलीप घुगे यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यामुळे घुगे विरुद्ध सतीश चव्हाण असा सामना रंगणार असल्याचं बोललं जात होतं. मात्र आता महायुतीतूनच भाजपचे एम. के. देशमुख यांनी उद्या अर्ज भरणार असल्याचं सांगितल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. मराठवाडा पदवीधर निवडणुकीमध्ये महायुतीत भाजपच्या एम. के. देशमुख यांनी बंडखोरी करीत उद्या अर्ज भरणार असल्याची घोषणा केलीय. एम. के. देशमुख हे माजी शिक्षणाधिकारी आहेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी ते निवृत्त झाले होते. त्या निवडणुकीत त्यांनी भाजपचे उमेदवार अतुल सावे यांच्या विरोधात निवडणुकीत उभे होते. मात्र ऐनवेळी त्यांनी उमेदवारी मागे घेतली. त्यावेळी भाजपकडून पदवीधर निवडणुकीत तिकीट दिले जाईल असे आश्वासन दिले होते अशी चर्चा आहे.


## शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेड
## परिशिष्ट – IV
## नियम – ८ (२) पहा

स्थावर मालमत्तेचा ताबा घेतलेली नोटीस

जसे की,

खाली स्वाक्षरी करणार हे शंकर नागरी सहकारी बँक लि; नवा मोंढा, नांदेड दि सेक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल असेट्स अॅण्ड इनफॉरसमेंट ऑफ सेक्युरीटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अंतर्गत प्राधीकृत अधिकारी आहेत व त्यांनी सदर कायद्याचे कलम १३ (२) नियम (९) सेक्युरिटी इंटरेस्ट इनफॉरसमेंट रुल्स २००२ नुसार दि.१०.०६.२०२६ रोजी बँकेचे कर्जदार श्री किशोर दामोधर भवरे यांना नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम रु.५७,१०,५९६/- (अक्षरी रक्कम सतावन्न लाख दहा हजार पाचशे शहान्नव रुपये) + पुढील होणारे व्याज ६० दिवसाच्या आत भरणा करण्यासाठी डिमांड नोटीस दिलेली होती. परंतु कर्जदाराने वरील नोटीसमध्ये नमुद केलेल्या रक्कमेचा भरणा न केल्यामुळे सदर नोटीसद्वारे संबंधीत कर्जदार व सर्व जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, खाली सही करणाऱ्यांनी सदरहु कायद्याचे कलम १३ (४) व नियम ९ नुसार त्यांना असलेल्या अधिकाराचा वापर करुन इतर मालमत्ता पैकी खालील नमुद स्थावर मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा दि.०१.१०.२०२६ रोजी घेतलेला आहे. तसेच कर्जदार, प्रॉपर्टी धारक व सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्ते संदर्भात कोणताही खेरदीचा/विक्रीचा व्यवहार किंवा करार करु नये म्हणुन ताबा घेतलेल्या सदर मालमत्ते संदर्भात असा कोणताही व्यवहार केल्यास त्यावर बँकेचे दि.३०.०९.२०२६ अखेर कर्ज रक्कम रु.५९,६५,९९८/- (अक्षरी रक्कम एकोणसाठ लक्ष पासष्ट हजार नऊश अठ्यान्नव रुपये) व त्यावर होणारे व्याज याचा बोजा असेल.

**ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचा खालील वर्णनाप्रमाणे तपशील**

मौजे नांदेड वाघाळा म.न.पा.हद्दीतील जंगमवाडी, नसरतपुर स्थित शेत सर्व्हे नं-७/२, प्लॉट क्र -१, म.न.पा. जुना मालमत्ता क्रं-१-११-६५७, नवीन मालमत्ता क्रं-१-६५७ पीन-४०१०१०९९२२, ज्याचे क्षेत्रफळ पूर्व-पश्चिम २५ चौ. फुट व दक्षिण उत्तर-८० चौ.फुट, एकूण क्षेत्रफळ २००० चौ.फुट असुन सदर स्थावर मालमत्ता श्री किशोर दामोधर भवरे यांचे नावे आहे.

**चर्तुःसीमा :-**

पूर्वेस- २० चौ.फुट रोड पश्चिमेस - उर्वरित मालमत्तेचा भाग
दक्षिणेस - प्लॉट क्रं-०७ उत्तरेस- नांदेड-पूर्णा रोड

स्वाक्षरीत/-
प्राधिकृत अधिकारी
शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड
मुख्य कार्यालय, नवा मोंढा, नांदेड.
मो.क्र. ९४२२८७४०३३

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## माहूर गडावर शारदीय नवरात्री उत्सवानिमित्त बैठक

### जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवाहन

### सर्व विभागांचे दोन हजारांवर अधिकारी-कर्मचारी ठेवणार

### भाविकांच्या आरोग्य, सोयी-सुविधा, सुरक्षा, वाहतुकीकडे लक्ष

**माहूर (प्रतिनिधी)–** माहूर गडावरील साडेतीन शक्तीपीठांपैकी मूळ पीठ असलेल्या माहूर गडावर दि. ११ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर २०२६ या काळात संपन्न होणाऱ्या शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सोयी- सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ११ वाजता जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली तर सह धर्मादाय आयुक्त तथा संस्थानच्या पदसिध्द अध्यक्षा हिराबाई शेळके, पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या उपस्थितीत यात्रा नियोजन आढावा बैठक संपन्न झाली.



यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, जि.प. चे मुकाअ महेश पाटील, मंदिर संस्थानच्या अध्यक्षा सह धर्मदाय आयुक्त श्रीमती हिराबाई शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी तथा उपाध्यक्ष किरणकुमार भोंडवे, सहायक जिल्हाधिकारी तथा सचिव बी. सरवणन, तहसीलदार तथा कोषाध्यक्ष अभिजीत जगताप जगताप विश्वस्त तथा पुजारी चंद्रकांत भोपी संजय कान्नव यांची उपस्थिती होती.

यात्रा काळात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसुर केल्यास कठोर कारवाई करणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले यात्राकाळात भावाकांसाठी सुलभ दर्शन रांग पिण्याचे पाणीलाईट आरोग्य व्यवस्था स्वच्छता परशुराम मंदिर परिसरात महाप्रसाद व साबुदाणा खिचडी फळांची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक विजय राऊत यांनी सांगितले नगरपंचायत प्रशासनातर्फे दत्त चौक टिपॉईंट येथे नियंत्रण कक्ष स्वच्छता पिण्याचे पाणी पथदिवे शौचालय इत्यादी व्यवस्था करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी सांगितले पाचशे पेक्षा जास्त अधिकारी कर्मचारी होमगार्ड यात्रेत येणाऱ्या भाविकांना सुरक्षा सुविधा देण्यासाठी सज्ज राहणार असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी दिली. वन विभागातर्फे वन्य प्राण्यांपासून भाविकांच्या सुरक्षेसाठी ठिकठिकाणी सुरक्षा पथक नियुक्त करून वन कर्मचाऱ्यांची जंगल शिवारात गस्त वाढविण्यात येणार असल्याचे वन परिक्षेत्र अधिकारी रोहीत जाधव यांनी सांगितले सा.बांधकाम विभागातर्फे रस्त्याची दुरुस्ती करण्यात येणार असल्याचे उप अभियंता डी. के. भिसे यांनी सांगितले.

## नांदेडमध्ये जात पडताळणी समितीकडे अर्जांचा ढीग; निवडणुकीमुळे रोज ५०० हून अधिक अर्ज, अधिकारी- कर्मचाऱ्यांची दमछाक

**नांदेड (प्रतिनिधी)–** जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी समाज कल्याण विभागाच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्जांचा अक्षरशः ढीग साचला आहे. विद्यार्थी, शासकीय नोकरीतील उमेदवार आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांकडून दररोज पाचशेहून अधिक अर्ज दाखल होत असल्याने समितीवरील कामाचा ताण प्रचंड वाढला आहे, अशी माहिती जिल्हा जात पडताळणी समितीच्या उपायुक्त डॉ. छाया कुलाल यांनी दिली आहे.

शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रम, सरकारी नोकरी तसेच विविध शासकीय योजनांसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक असते. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून वर्षभर अर्ज दाखल होत असतात. यंदा त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची भर पडली आहे. राखीव जागेवर निवडणूक लढविण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असल्याने अर्जांची संख्या अचानक वाढली आहे.

**'जुन्या प्रकरणांचाही भार'**

नवीन अर्जांसोबतच पूर्वी दाखल झालेल्या प्रकरणांची छाननी, कागदपत्रांची पडताळणी, त्रुटी पूर्तता, सुनावणी आणि अंतिम निर्णयाची प्रक्रिया पार पाडावी लागते. अनेक अर्जदारांकडून अपूर्ण कागदपत्रे सादर होत असल्याने त्यांना पुन्हा कागदपत्रे मागवावी लागतात, त्यामुळे एका प्रकरणाच्या निर्णयासाठी लागणारा वेळ वाढत आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी वैधता प्रमाणपत्र हातात असणे बंधनकारक असल्याने इच्छुक उमेदवारांकडून प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मोठी धावपळ सुरू आहे. समितीच्या कार्यालयात अर्जदारांची गर्दी वाढली असून, प्रलंबित प्रकरणे वेळेत निकाली काढण्याचे मोठे आव्हान अधिकाऱ्यांसमोर आहे.

**मनुष्यबळ वाढविण्याची गरज**

जात पडताळणीची प्रक्रिया कागदपत्रांची बारकाईने तपासणी करून करावी लागत असल्याने घाई करणे शक्य नाही. वाढत्या कामाच्या तुलनेत उपलब्ध मनुष्यबळ मर्यादित असल्याने अधिकारी - कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत आहे. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलदगतीने करण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी, स्वतंत्र कक्ष आणि तात्पुरती यंत्रणा उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली आहे.

## जिल्ह्यात अवैध वाळू चोरीवर कारवाई; तीन गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक आणि चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, पोलिसांनी तीन ठिकाणी कारवाई करत गुन्हे दाखल केले आहेत.

दि. ५ ऑक्टोबर रोजी पहाटे २ वाजता प्रतापनगर पाटीजवळ आरोपी स्वराज उर्फ माधव एकनाथ मोरे (रा. पिंपळगाव कोरका) हा विना परवाना २० लाख रुपये किंमतीच्या विनाक्रमांक हायवा टिपरमध्ये २० हजार रुपये किंमतीची ५ ब्रास वाळू चोरटी विक्रीसाठी वाहतूक करताना आढळला. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५७१/२०२६ कलम ३०३(२) BNS अन्वये गुन्हा दाखल असून पोउपनि सोनटक्के तपास करीत आहेत.

दि. ४ ऑक्टोबर रोजी रात्री १०.१५ वाजता जिजाऊ चौक, मुगट रोडवर हणमंत तुकाराम मेळगावे (वय ४२, रा. शंकतीर्थ) हा ४० लाख रुपये किंमतीच्या टिपर (क्र. MH-२६ CH-४७५७) मध्ये १२ हजार रुपयांची ४ ब्रास वाळू वाहतूक करताना मिळून आला. मुदखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. १९०/२०२६ कलम ३०३(२) BNS सह जमीन महसूल अधिनियम ४७, ४८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ५ ऑक्टोबर रोजी रात्री १२.१५ वाजता म्हाडा कॉलनीजवळ संतोष भिमराव सूर्यवंशी (वय २६, रा. बळेगाव) व परमेश्वर येताळे (रा. कौडगाव) हे दोघे संगनमत करून १५ लाख रुपये किंमतीच्या हायवा (क्र. चक-२६ इए-६७७६) मध्ये २० हजार रुपयांची ४ ब्रास वाळू वाहतूक करताना आढळले. उमरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. २८५/२०२६ कलम ३०३(२), ३(५) इछड अन्वये गुन्हा दाखल आहे.

दि. २ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता कारंजा ते नांदेड प्रवासादरम्यान मध्यवर्ती बसस्थानकात अनुष्का घनश्याम दळवी (वय २६, रा. काबरा नगर) यांच्या पर्समधील ७६ हजार रुपये किंमतीचे सोने अज्ञात चोरट्याने चोरून नेले. वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५०६/२०२६ दाखल आहे.

दि. ५ ऑक्टोबर रोजी पहाटे ४.३० वाजता देगाव शिवारातील द गार्डन गॅलरी नर्सरीच्या मोकळ्या जागेत रामचंद्र गणेश चन्नेबोईनवाड (रा. यरंडेश्वर, ता. पूर्णा) यांच्या बॅगेतील ८८ हजार ६०० रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम आणि ट्रकमधील १२ हजार रुपयांचा ठशवाळ मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला. कुंटूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २६१/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

## 'ऑपरेशन यात्री सुरक्षा'; नांदेड विभागात आरपीएफची विशेष मोहीम, ५ चोरटे जेरबंद

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रवाशांच्या सामानाची चोरी रोखण्यासाठी आणि रेल्वे प्रवाशांची सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी रेल्वे सुरक्षा दल नांदेड विभागातर्फे दि. ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध रेल्वे स्थानकांवर विशेष निगराणी, गुप्त पाहणी व प्रतिबंधात्मक तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ५ संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

दि. १ ऑक्टोबर रोजी दुपारी २.१५ वाजता RPF/CIB-DI/NED व LCB/GRP/छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त पथकाने गाडी क्र. १२७८८ नांदेड- नाशिक एक्सप्रेसच्या प्लॅटफॉर्म क्र. २ वरील थांब्यादरम्यान निगराणी केली. यावेळी मुस्तफा (वय ३५, रा. छत्रपती संभाजीनगर) यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून २४ हजार रुपये किंमतीचा Realme कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला. सदर मोबाईल जनरल डब्यातील प्रवाशाकडून चोरी केल्याचे त्याने कबूल केले. त्याच्याविरुद्ध GRP/छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा क्र. ४६१/२०२६, कलम ३०५(C), BNS-२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे दुसरा संशयित ताब्यात त्याच दिवशी सायंकाळी ५.५० वाजता गाडी क्र. १७६८७ मराठवाडा एक्सप्रेसमध्ये ठझऋ पथकाने जाकिरुद्दीन (वय ४२, रा. छत्रपती संभाजीनगर) यास गर्दीचा फायदा घेऊन प्रवाशांच्या खिशातील मालमत्ता चोरीचा प्रयत्न करताना ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अन्वये झठ क्र. ११३/२०२६ नोंद करण्यात आली आहे.

मानवत स्थानकावर संशयित ताब्यात दि. ३० सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता मानवत स्थानकावर SIPF/सेलू व ToPB प्रतिबंधक पथकाने जावेद (वय ३८, रा. अमरावती) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून १२ हजार ९९० रुपये किंमतीचा Vivo Y20 मोबाईल जप्त करण्यात आला. NCR क्र. २०६/२०२६ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

परभणी स्थानकावर कारवाई दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता परभणी स्थानकावर गाडी क्र. १७६२९ हडपसर- नांदेड एक्सप्रेसमध्ये माबूद (वय ३५, रा. परभणी) यास चोरीच्या प्रयत्नात ताब्यात घेण्यात आले. NCR क्र. ५८/२०२६, BNS कलम १२८ अन्वये नोंद करण्यात आली आहे.

## गंगाधर सुरबुलवाड यांचे निधन



**उमरी (प्रतिनिधी)–** बाचेगाव ता. धर्माबाद येथील रहिवासी गंगाधर लिंबाजी सुरबुलवाड यांचे ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ५८ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, नातू २ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे

दि. ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ११ वाजता बाचेगाव ता. धर्माबाद येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. उमरी पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी शंकर बेळकोणे यांचे ते भाऊ होत.

## शंकरराव पाटील यांचे निधन



**लोहा (प्रतिनिधी)–** तालुक्यातील पांगरी येथील कै. शंकरराव डिगाजी पा. बुद्रुक यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. पांगरी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. शिवसेनेचे नांदेड दक्षिणचे संघटक तथा पांगरीचे माजी सरपंच सुदाम पाटील बुद्रुक व लोहा येथील सुप्रसिद्ध व्यापारी बाबुराव पाटील बुद्रुक यांचे ते वडील होत.

## अर्धापूर तालुक्यातील शेतीसाठी दिवसा ६ तास वीज पुरवठा करा; शेतकऱ्यांची मागणी

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील शेतकऱ्यांना दिवसा ६ तास वीज पुरवठा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी वीज वितरण कंपनीचे उपविभागीय अभियंता पंकज देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे मंगळवार, दि. ६ रोजी केली आहे.



शेतकरी दुष्काळामुळे अनंत अडचणीचा सामना करीत असून शेतीतील ऊस, हाळद, फुल शेती, भाजीपाला यासह अनेक शेती पिकांचे उत्पादन घेऊन शेतकरी कुटुंबाची उपजीविका भागवितात पण वीज वितरण कंपनी रात्री, बेरात्री अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा करून शेतकऱ्यांना अनंत बेजार करीत आहेत. वितरण कंपनीच्या धोरणानुसार शेतीत लाईट कधी येते, कधी जाते काही कळत नसल्यामुळे शेतकरी त्रस्त होत आहेत. वीज वितरण कंपनीने शेतीसाठी दिवसा ६ तास वीज पुरवठा करावा, अशी मागणी उपविभागीय अभियंता यांना निवेदन दिले आहे.

यावेळी शेतकरी भगवान कदम, जनकराव वानखेडे, परशुराम खुळे, पंडित कदम, संतोष कदम, दशरथ कदम, सुभाष आबादार, गोपीनाथ जाधव, परमेश्वर आबादार, पंढरीनाथ आबादार यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## दिवाळीनिमित्त तात्पुरत्या फटाका विक्री परवान्यासाठी १३ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सन २०२६ मधील दिवाळी उत्सव दि. ५ ते ११ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड महानगरपालिका हद्दीसाठी तात्पुरते फटाका विक्री परवाने जिल्हा दंडाधिकारी कार्यालयामार्फत तर जिल्ह्यातील संबंधित उपविभागांच्या कार्यक्षेत्रासाठी उपविभागीय दंडाधिकारी यांच्यामार्फत निर्गमित करण्यात येणार आहेत. त्यासाठी तात्पुरत्या फटाका विक्री परवान्याचे अर्ज दि. १३ ऑक्टोबर पर्यंत संबंधित कार्यालयात स्वीकारले जाणार आहेत.

नांदेड महानगरपालिका हद्दीतील तात्पुरत्या फटाका परवान्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू समितीमार्फत, तर जिल्ह्यातील इतर भागांसाठी संबंधित उपविभागीय कार्यालयामार्फत अर्ज स्वीकारण्यात येतील. अर्जदारांनी विस्फोटक अधिनियम व स्फोटक नियम, २००८ मधील तरतुदींनुसार विहित नमुना ए-५ मध्ये अर्ज सादर करावा.

अर्जासोबत फटाका विक्रीच्या दुकानाचा नकाशा, दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे, रुपये ६०० शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत, सामूहिक विक्री केंद्र असल्यास दुकान क्रमांक नमूद असलेले वाटपपत्र, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, संबंधित पोलीस ठाण्याचे चारित्र्य व ना-हरकत प्रमाणपत्र, जिल्हा व्यवसायकर अधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र, विद्युत निरीक्षकांचे ना-हरकत प्रमाणपत्र, जागेच्या मालकी हक्काचा पुरावा आणि संबंधित तहसीलदारांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## डीआयजी पथकाची हिंगोलीत गुटख्याविरुद्ध धडक कारवाई; औंढ्यात ४.३४ लाखांचा साठा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी विशेष पथक हिंगोली जिल्ह्यात रवाना केले होते. या पथकाने दि. ५ ऑक्टोबर रोजी औंढा नागनाथ येथे मोठी कारवाई केली.



औंढा नागनाथ पोलीस ठाणे हद्दीतील खातीब कॉलनी, हिंगोली रोड येथे प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची अवैध साठवणूक व विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर DIG यांच्या पथकाने वाहबोद्दीन खमरोहीन खतीब यांच्या राहत्या घरावर छापा टाकला. या कारवाईत ४ लाख ३४ हजार ९९६ रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आला.

जप्त मालामध्ये राज निवास पान मसाला, गोवा, आरएमडी, विमल, सुगंधित जर्दा व जाफरानी जर्दा इत्यादी प्रतिबंधित पदार्थांचा समावेश आहे.

या प्रकरणी वाहबोद्दीन खमरोद्दीन खतीब (रा. खातीब कॉलनी, हिंगोली रोड, औंढा नागनाथ, जि. हिंगोली) याच्याविरुद्ध औंढा नागनाथ पोलीस ठाण्यात गु.र.नं. ९९२/२०२६ कलम १२३, २२३, २७४, २७५ भारतीय न्याय संहिता सह कलम २६(२)(iv), २७(३)(e), २७(३)(d), ३०(२)(a), ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोहेकॉ प्रदीप खानसोळे, पोहेकॉ गणेश राठोड, पोहेकॉ संदीप वाघाडे व पोहेकॉ गजानन डवरे यांनी पार पाडली. पथकाच्या कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी अभिनंदन केले आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचविता यावी यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा 'खबर' हेल्पलाइन क्रमांक सुरू केला असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती या क्रमांकावर कळवावी, असे आवाहन उमाप यांनी केले आहे.

## आदिवासी मन्नेरवारलू समाजावरील अन्यायाविरोधात उग्र आंदोलनाचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** आदिवासी मन्नेरवारलू समाजातील विद्यार्थ्यांना जातीचे आणि वैधता प्रमाणपत्र मिळण्यात प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात अडवणूक केली जात आहे. जाचक अटी लादून आणि अन्यायी शासन निर्णय काढून समाजाला आदिवासींच्या यादीतून बाहेर फेकण्याचे कटकारस्थान सुरू असल्याचा घणाघाती आरोप राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाचे सचिव सुरेशराव अंबुलगेकर यांनी केला. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी एक मन्नेरवारलू, लाख मन्नेरवारलू एकसंघ होऊन रस्त्यावरची आणि न्यायालयीन लढाई लढतील, असा इशारा त्यांनी दिला. नांदेड येथे रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी आयोजित राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या राज्यस्तरीय मार्गदर्शन शिबिरात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड हे होते. महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि उपस्थित मान्यवरांच्या सत्काराने शिबिराची सुरुवात झाली. या सोहळ्याला राज्यभरातून हजारो समाजबांधव, महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित असल्याने सभागृह खच्चाखच भरले होते. आपल्या भाषणात अंबुलगेकर म्हणाले की, प्रमाणपत्रांसाठी कोणत्याही दलालांच्या नादी लागू नका. समाजातील गोरगरीब बांधवांना दलालांनी फसवल्यामुळेच आज समाजावर ही वेळ आली आहे. मन्नेरवारलू, मुनुरवार, मुनरवाड, मन्नेरवार हे सर्व एकच आहेत. परंतु वरील जमातींनी कोणतीही मागणी न करता त्यांना एसबीसीमध्ये समावेश करण्याचा २४ एप्रिल १९८५ चा अन्यायी शासन निर्णय काढण्यात आला तो निर्णय तातडीने रद्द करण्यात यावा, 'कंडिशनल प्रमाणपत्र' आणि 'रिओपनिंग'च्या नावाखाली समाजबांधवांना दिला जाणारा त्रास त्वरित थांबवावा, तसेच बनावट प्रमाणपत्र काढणाऱ्यांना आणि देणाऱ्यांना आमचा कायम विरोध आहे. परंतु खोट्या प्रमाणपत्रांच्या कायद्यातील कठोर अटी शिथिल कराव्यात आदी प्रमुख मागण्या त्यांनी शासनाकडे मांडल्या. शासनाने या मागण्यांची दखल न घेतल्यास न्यायालयात दाद मागितली जाईल आणि त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आर्थिक व नैतिक पाठबळ द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात लक्ष्मणराव ठक्करवाड म्हणाले की, समाज बोलण्यापेक्षा कृतीची अपेक्षा करत आहे. हा लढा कोणत्याही जात, पक्ष किंवा अधिकाऱ्यांच्या विरोधात नसून केवळ मन्नेरवारलू समाजाच्या न्याय-हक्कासाठी आहे. राजकीय किंवा वैयक्तिक फायद्यासाठी समाजाचा वापर केला जाणार नाही, अशी ग्वाही देत त्यांनी लवकरच नांदेड जिल्ह्यात मन्नेरवारलू समाजाचे भव्य राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्याची घोषणा केली. या कार्यक्रमात संघटना मजबूत करण्यासाठी राज्यभरातील विविध जिल्हा व तालुक्यांच्या नवनिर्वाचित अध्यक्षांना आणि सचिवांना नियुक्तीपत्रे देऊन जिल्हा व तालुका निहाय कार्यकारिणी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. या शिबिराला महासंघाचे उपाध्यक्ष मारोतराव कंठेवाड, कोषाध्यक्ष नामदेव मिठ्ठेवाड, सहसचिव व्यंकटराव सुरेवाड, सविता कंठेवाड, मोहनराव गोपुलवाड, दिलीप बास्टेवाड, नागनाथ अनंतवाड, गंगाधर गिरोड, मधुकर उन्हाळे, यलप्पा कोलेवाड, डॉ. इरवंत पल्लेवाड, डॉ. नागेश लखमवाड, सुधाकर कचकलवाड, महाजन उपलवाड, शंकर कंत्तेवार, सदाशिव पपुलवाड, डॉ. डी.आर. कवडेवार, यादवराव येवतीवाड, राधाजी कनसटवाड, रविंद्र अकोले, ॲड. प्रतिक पसलवाड, रामचंद्र मुसळे, शिवकुमार बैनवाड, बाळू पेंन्टेवाड, अमितकुमार कंठेवाड, नयन पुदलवाड, संजय नागमवाड, सुनिल माचेवाड यांच्यासह समाजातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com